cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२०२ | बुधवार दि.१९ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## मते खरेदी करण्याचाच प्रकार!

बिहार विधानसभेचा निकाल नुकताच लागला असून, निवडणुकीचे निकाल भाजप आणि निवडणूक आयोगाच्या अपेक्षेनुसार लागले असे बोलले जात आहे. या पूर्वी महाराष्ट्र, हरियाणात केले गेलेले ऐनवेळी वाढणाऱ्या मतदार संख्येचे जादूचे प्रयोग बिहारमध्येही यशस्वी झाले, असे म्हटले जात आहे.

# शेतकऱ्यांनो आज खात्याची तपासणी करा

## राज्यातील ९० लाख ४१ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर पीएम किसानचा हप्ता जमा होणार


पुणे । प्रतिनिधी

**पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा अर्थात पीएम किसानचा २१ व्या हप्त्याचे वितरण बुधवारी (दि.१९) करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी तमिळनाडूच्या कोईमतूर येथून दुपारी १ वाजता थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात निधी जमा करणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांनी आपआपल्या खात्याची तपासणी करावी.**



राज्यातील पीएम किसान योजनेच्या ९०.४१ लाख पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८०८ कोटींहून अधिकचा निधी जमा करण्यात येणार आहेत, अशी माहिती कृषी विभागाने प्रसिद्धी पत्रकात दिली आहे. पीएम किसान योजना २०१९ पासून देशभरात राबवली जाते. या योजनेंतर्गत शेतकरी कुटुंबाला २ हजार रुपये या प्रमाणे तीन हप्त्यात वार्षिक ६ हजार रुपये दिले जातात. या योजनेतून २० हप्त्यांमध्ये ३७ हजार ५०२ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. या योजनेच्या लाभासाठी अभिलेख नोंदणी अद्यावत करणे, बँक खाते आधार संलग्न करणे, ई-केवायसी प्रमाणिकरण करणे, या बाबी बंधनकारक आहेत. ज्या शेतकऱ्यांनी या बाबीची पूर्तता केली नसेल, त्या शेतकऱ्यांना लाभ मिळणार नाही, असेही कृषी विभागाने सांगितले आहे. राज्यातील कृषी विज्ञान केंद्र, तसेच जिल्हा, तालुका व ग्राम पंचायत स्तरावर, कृषी उत्पन्न बाजार समिती, विविध कार्यालये, संशोधन केंद्रे, शेतकरी उत्पादक ▶▶ पान २ वर

## बीडमध्ये हवाल्याचे रॅकेट उद्ध्वस्त; १७ लाखांची रोकड जप्त



बीड । प्रतिनिधी

**शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका हवाला रॅकेटवर कारवाई करत तब्बल सतरा लाखांची रोकड ताब्यात घेतली आहे. बीड शहरात निवडणुकीच्या कालावधीमध्ये पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांनी ही कारवाई केली या प्रकरणी शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

शहरातील मसरत नगरमधील एका अपार्टमेंटमध्ये पैशांचा बाजार भरवून हवाला सुरु असल्याची माहिती डीवायएसपी पूजा पवार यांना मिळाली होती. त्यानुसार सायंकाळी त्यांच्या टीम ने छापा मारला असता घरात १७ लाखांची रोकड आढळून आली आहे. यावेळी पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले असून, सदर कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, एपीआय पुजारी, सचिन आगलावे, मनिषा केदार यांनी केली. सध्या नगरपालिका निवडणुकांची आचारसंहिता ▶▶ पान २ वर

## भाजपकडून फोडाफोडी ; शिंदेसेनेचा कॅबिनेटवर बहिष्कार



मुंबई । प्रतिनिधी

**शिवसेना आणि भाजप यांच्यातील धुसफूस वाढत चालली आहे. शिंदेसेनेच्या मंत्र्यांनी मंगळवारी झालेल्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कॅबिनेट बैठकीला उपस्थित होते. पण सेनेच्या अन्य मंत्र्यांनी बैठकीला दांडी मारली. भाजपकडून सुरु असलेल्या पक्ष प्रवेशांमुळे शिंदेसेनेत नाराजी आहे. शिंदेसेनेचे आमदार असलेल्या, वर्चस्व असलेल्या भागांमध्ये भाजपनं ताकद वाढवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे शिंदेसेनेत अस्वस्थता आहे.**

एकीकडे या घडामोडी सुरु असताना दुसरीकडे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मुंबईत दोन महत्त्वाचे पक्षप्रवेश उरकले. रविंद्र चव्हाण यांनी पक्ष प्रवेशांचा सपाटा लावल्यानं शिंदेसेनेत नाराजी आहे. त्याच कारणास्तव शिंदेसेनेचे मंत्री फडणवीसांच्या भेटीला गेले होते. पण या भेटीचा काडीमात्र फरक पडलेला ▶▶ पान २ वर

### अधिकारच नाहीत तर मंत्रिमंडळ बैठकीला जायचे कशाला?

शिंदे गटातील मंत्र्यांच्या मंत्रिमंडळ बैठकीवरील बहिष्कारामागे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर व्यक्त केलेल्या संतापामागे मुख्य कारण भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण असल्याचे उघड झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रवींद्र चव्हाण यांनी ठाणे जिल्ह्यातील शिंदे गटाचे अनेक माजी नगरसेवक भाजपमध्ये सामील करून घेतले आहेत. यावरून ही ठिणगी उडाली आहे. निधी वाटप आणि वळवण्याबाबतही शिंदे गटाच्या नेत्यांना तारेवरची कसरत करावी लागत असल्याच्या तक्रारी आहेत. जर आपल्या मंत्र्यांना निधी वाटप, अधिकारी बदली असे अधिकारच नसतील कर बैठकीला जाऊन काय उपयोग असे या मत्र्यांनी शिंदेंना विचारले होते. यानंतरच बैठकीत शिंदेंच्या मंत्र्यांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता, असे सांगितले जात आहे.

## राज्यात थंडीचा मुक्काम वाढणार

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील काही भागात थंडीची लाट कायम असून, राज्यात बहुतांशी भागात तापमान कमी झाले आहे. आणखी काही दिवस राज्यात थंडीचा मुक्कम असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. तसेच किमान आणि कमाल तापमानातील घट कायम राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला.**

राज्यातील बहुतांशी भागात किमान तापमानातील घट कायम आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात थंडीची लाट आहे. पुणे, सोलापूर, अहिल्यानगर, नाशिक, धुळे, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी आणि हिंगोली तसेच यवतमाळ, गोंदीया आणि भंडारा जिल्ह्यात थंडीची लाटेचा ▶▶ पान २ वर

## राज्यातील पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### बीडचे अति. जिल्हाधिकारी कुलकर्णी पुणे बोर्डाचे अध्यक्ष

मुंबई । प्रतिनिधी

**आयएएस अधिकाऱ्यांच्या बदलाचे सत्र चालूच असून, मंगळवारी आणखी पाच अधिकाऱ्याच्या बदल्या करण्यात आल्या. यात बीडचे तत्कालीन अतिरिक्त जिल्हाधिकारी त्रिगुण कुलकर्णी यांची पुणे दहावी बारावी बोर्डाच्या अध्यक्षच संचालक पदी नियुक्ती करण्यात आली.**



राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच राज्यातील ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. मंगळवारी १८ नोव्हेंबर रोजी प्राप्त बदली आदेशानुसार त्रिगुण कुलकर्णी यांची इयत्ता १० वी आणि १२ वी शिक्षण बोर्डाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्रिगुण कुलकर्ण हे सध्या पुण्यातील सनदी अधिकाऱ्यांसाठीची प्रशिक्षण संस्था असलेल्या यशदा येथे उपमहासंचालक पदावर कार्यरत होते. तसेच, राहुल रंजन महिवाल, प्रकाश खपले, डॉ. मंजिरी मानोलकर, अंजली रमेश या चार आयएएस अधिकाऱ्यांचीही बदली ▶▶ पान २ वर

## दिल्ली बॉम्बस्फोट प्रकारणी मुंबईचे तिघे ताब्यात

मुंबई । प्रतिनिधी

दिल्लीतील बॉम्बस्फोटाच्या तपासाला नवे वळण लागले असून या प्रकरणाचे मुंबईशी महत्त्वाचे कनेक्शन उघड झाल्याची माहिती समोर आली आहे. तपास यंत्रणांनी मुंबईतील तीन वेगवेगळ्या ठिकाणांवरून तीन उच्चशिक्षित संशयितांना गुप्त ऑपरेशनद्वारे ताब्यात घेतले असून, सध्या त्यांची दिल्लीमध्ये चौकशी सुरू आहे.

सुत्रांच्या माहितीनुसार, ताब्यात घेतलेल्या तिघांचा दिल्लीतील बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपींशी एका विशिष्ट, एन्क्रिप्टेड ॲप्लिकेशनद्वारे नियमित संपर्क होता. हे ॲप अत्यंत सुरक्षित सिस्टीमवर चालत असल्याने त्यावरील मेसेज तपास यंत्रणांना शोधणे कठीण होते. या ॲपवरील चॅट, कॉल लॉग्स आणि फाइल्स सध्या डिजिटल फॉरेन्सिक टीम तपासत आहे. तिघांना ताब्यात घेण्यासाठी दिल्ली पोलिस, केंद्रीय तपास यंत्रणा आणि मुंबई पोलिसांनी अत्यंत गोपनीय ऑपरेशन राबवले. या कारवाईत तीन वेगवेगळ्या भागांतून तीन सुशिक्षित व्यक्तींना ताब्यात घेतले आहे. आणि त्यांना ताबडतोब विमानाने दिल्लीला हलवण्यात आले. तपास यंत्रणांच्या म्हणण्यानुसार, या तिघांच्या डिजिटल डिव्हाईसमधून महत्त्वाचे पुरावे मिळण्याची शक्यता आहे. ताब्यात घेतलेले तिन्ही संशयित सुशिक्षित ▶▶ पान २ वर

## काँग्रेसने एकटे लढण्याच्या निर्णयाचा पुर्णविचार करावा; ठाकरेंचा सल्ला!


मुंबई । प्रतिनिधी

मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत काँग्रेसने एकट्याने लढण्याची केलेली घोषणा विरोधी पक्षांच्या एकतेसाठी हानिकारक आहे, असे ठाकरेसेनेने म्हटले आहे. मुंबई वेगळी करण्याची भाजपची योजना उधळून लावण्यासाठी एकत्रित लढाईचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील मनसेला विरोधी गटात घेतल्यास त्यांचा उत्तर भारतीय आणि मुस्लिम मतदारांच्या संख्येत घट होण्याची काँग्रेसला असलेल्या चिंतेवर प्रकाश टाकला आहे. काँग्रेसने अलीकडेच बीएमसी निवडणूक स्वतंत्रपणे लढण्याची घोषणा केली आहे. काँग्रेसला चिंता आहे की, जर शिवसेना (उबाठा) आणि मनसे एकत्र आले तर हिंदी भाषिक लोक आणि मुस्लिम समुदायातील त्यांच्या शक्यतांना धक्का बसेल. तथापि, राज ठाकरे किंवा ठाकरेसेना बिहारमध्ये नव्हती, तरीही काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मुस्लिम समुदायाने महाविकास आघाडीला पाठिंबा ▶▶ पान २ वर

## मुंबई महापालिका निवडणुकीत महायुतीची एकत्र लढाई

### बावनकुळे यांची घोषणा



मुंबई । प्रतिनिधी

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजप आणि महायुती एकत्रितपणे लढणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार अमित साटम यांनी केली आहे. मुंबईत आम्ही एकत्रितपणे निवडणूक लढवणार आहोत. दोन तृतीयांश जागा आणि किमान ५१ टक्के मतदान मिळवून सत्ता हस्तगत करण्याचा आमचा प्रयत्न आहे, अशी स्पष्ट भूमिका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी व्यक्त केली. ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### दिल्लीतील न्यायालये, शाळांना बॉम्बने उडवण्याची धमकी

नवी दिल्ली: दिल्लीतील साकेत, द्वारका आणि पटियाला हाऊस न्यायालय यासह सीआरपीएफ संचालित दोन शाळांना मंगळवारी सकाळी बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली. यानंतर न्यायालयाचा परिसर आणि शाळांना खाली करण्यात आले. मात्र, बॉम्बचा शोध घेण्यासाठी करण्यात आलेल्या तपासात धमकी खोटी असल्याचे निष्पन्न झाले. दहशतवादी मॉड्यूलच्या नावाने पाठवलेल्या ईमेलमध्ये सकाळी न्यायालयाच्या परिसरात स्फोटके ठेवल्याचा दावा करण्यात आला होता, ज्यामुळे तात्काळ सुरक्षा सतर्कता वाढवण्यात आली. जिल्हा न्यायालय संकुलांची सुरक्षा चौकशी करण्यासाठी बॉम्ब निकामी पथक, श्वान पथक आणि स्थानिक पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या अनेक पथकांना तैनात करण्यात आले होते.

### माओवादी कमांडर मडवी हिडमा एन्काऊंटरमध्ये ठार

हैद्राबाद: भारतीय सुरक्षा दलं अन् नागरिकांवर झालेल्या २६ नक्षलवादी हल्ल्याचे नेतृत्व करणाऱ्या मडवी हिडमाचा एन्काऊंटर करण्यात आला आहे. आंध्र प्रदेशातील अल्लुरी सितारामराजू जिल्ह्यातील मरेदुमिल्ली जंगलात नक्षलवादी आणि आंध्र प्रदेश पोलीस यांच्यात चकमक उडाली. या भागाला आंध्र प्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणा या तीन राज्यांच्या सीमा लागून आहेत. या चकमकीत हिडमा सोबत जवळपास सहा नक्षलवाद्यांचे मृतदेह आतापर्यंत हाती लागले आहेत. आंध्र प्रदेशचे डीजीपी हरीश कुमार गुप्ता यांनी या चकमकीबाबत माहिती दिली. ही चकमक मंगळवारी सकाळी ६ ते ७ च्या सुमारास सुरू झाली. पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईत सहा माओवादी दहशतवादी ठार झाले आहेत. त्यात त्यांच्या लीडरचा देखील समावेश होता.

### पूजेचा अधिकार विशिष्ट जागेसाठी नाही–न्यायालय

दिल्ली: एका विशिष्ट जागेला धर्माच्या आचरणाशी जोडले जाऊ शकते का? असा सवाल करत धर्माचे पालन किंवा पूजा याला एका विशिष्ट जागेशी जोडता येत नाही,'' असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. चेन्नईतील लष्करी क्षेत्रात असलेल्या मशिदीत नागरिकांना नमाज अदा करण्याची परवानगी देण्याची मागणी करणारी याचिका न्यायालयाने फेटाळून लावली. चेन्नईतील मस्जिद-ए-आलिशान नागरिकांना उपलब्ध होती. १८७७ ते २००२ दरम्यान मशीद मुक्तपणे प्रवेशयोग्य होती. त्या काळात कधीही सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला नव्हता. मात्र २००२ पासून सुरक्षेच्या कारणास्तव येथे नमाज अदा करण्यास परवानगी नाकारण्यात आली. या मशिदीमध्ये नमाज अदा करण्याची परवानगी मिळावी, अशी याचिका चेन्नई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती.

### ब्राह्मण, आर्य वैश्य, राजपूत तरुणांसाठी योजना

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या ब्राह्मण, आर्य वैश्य आणि राजपूत समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी कर्ज व्याज परतावा योजना जाहीर केली आहे. या समाजासाठी घोषित झालेली ही वैयक्तिक आर्थिक लाभाची पहिली योजना आहे. या तिन्ही योजनांमध्ये प्रत्येकी ५० लाभार्थींना प्रतिवर्षी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ मिळणार आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या वर्षी ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास, राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप तर आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक महामंडळ स्थापन केले होते.

## 'गॅस सिलिंडर'साठी वंचित उच्च न्यायालयात

मुंबई । प्रतिनिधी

**पक्षाचे निवडणूक चिन्ह राज्य निवडणूक आयोगाने मुक्त चिन्हांच्या यादीत समाविष्ट केल्याच्या निर्णयाविरोधात वंचित बहुजन आघाडीने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी पक्षाच्या वतीने करण्यात आली. तथापि, न्यायालयाने त्यास नकार दिला.**

वंचितने गॅस सिलेंडर या चिन्हावर लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लढवल्या आहेत. परंतु राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मुक्त चिन्हांच्या यादीत गॅस




सिलिंडर या चिन्हाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, वंचितच्या वतीने उच्च न्यायालयात याचिका करण्यात आली आहे. मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या ▶▶ पान २ वर

## जिसका चलेगा नोट उसको मिलेगा जादा वोट

बीड । प्रतिनिधी

राज्यात सुरू असलेल्या नगरपालिकांच्या निवडणुकीत लोकशाहीची खरी कसोटी पैशाच्या बळावर उतरताना दिसत आहे. जिसका चलेगा नोट उसको मिलेगा जादा वोट. अशी स्थिती अनेक ठिकाणी निर्माण झाली असून, निवडणुकीचा खरा अर्थ, तत्त्वे, विचारसरणी आणि विकासाचा मुद्दा बाजूला पडत चालला आहे. लोकशाहीची प्रतिष्ठा डागाळणारा हा प्रकार मतदारांना आणि प्रामाणिक उमेदवारांना मोठा धक्का देणारा आहे. पैशाचे




पॅकेज, पॅकेटची देवाणघेवाण, कुठे वाहनाची सोय, कुठे पार्टी, तर कुठे रोख प्रलोभने, अशा विविध मार्गांनी पैसा मागितला जातो आणि तो दिलाही जात आहे. विशेष म्हणजे असे प्रकार राजकारणातील वरिष्ठ नेत्यांकडूनच होऊ लागल्याने कार्यकर्तेही अशीच भाषा बोलताना दिसत आहेत. खरे तर हे सगळे चिंताजनक आहे मात्र त्याला रोखणेही अवघड झाले आहे.

दिवसेंदिवस परिस्थिती बदलत आहे निवडणुकांची परिस्थिती देखील बदलताना दिसत आहे. पूर्वी व्यक्ती, विचार आणि निष्ठा यावर निवडणुका लढल्या जायच्या आणि जिंकल्या जायच्या आणि कार्यकर्ते देखील निष्ठा, नेता यावर विश्वास ठेवायचे. मात्र आता ती परिस्थिती कुठेच दिसून येत नाही. नेता कधी या पक्षातून त्या पक्षात जाईल हे सांगणे कठीण आहे. त्याचा चांगला अनुभव बीड जिल्ह्यातील जनतेला आहे. बीड जिल्ह्यातील बीड, अंबाजोगाई, परळी, माजलगाव ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४६.५० क्विंटल | २,३९१ | २,८७१ | २,६३७ |
| ज्वारी/हायब्रिड: ५१.५० क्विंटल | २,३५० | ४,१०१ | ३,२१९ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : १५.०० क्विंटल | ६,००१ | ६,६०१ | ६,३०१ |
| उडीद : १७.५० क्विंटल | ४,२०१ | ५,९८० | ४,८७१ |
| बाजरी: १२८.५० क्विंटल | २,४०१ | ३,०९० | २,८४३ |
| मुग: २.०० क्विंटल | ४,६०१ | ६,४०० | ५,५०० |
| सोयाबीन: १८८.५० क्विंटल | ४,२५० | ४,५२१ | ४,४२८ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ४,३०१ | ५,१९० | ४,७९७ |

cmyk

अग्रलेख

# मते खरेदी करण्याचाच प्रकार !

बिहार विधानसभेचा निकाल नुकताच लागला असून, निवडणुकीचे निकाल भाजप आणि निवडणूक आयोगाच्या अपेक्षेनुसार लागले असे बोलले जात आहे. या पूर्वी महाराष्ट्र, हरियाणात केले गेलेले ऐनवेळी वाढणाऱ्या मतदार संख्येचे जादूचे प्रयोग बिहारमध्येही यशस्वी झाले, असे म्हटले जात आहे. आता हाच खेळ पश्चिम बंगाल, केरळमध्येही केला जाईल. खरे तर अलिकडे निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर वरचेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. आयोगाच्या दृष्टीने हे चांगले नाही. निवडणूक आयोग ही संवैधानिक आणि स्वायत्त संस्था आहे. देशात निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुका पार पाडण्यासाठी या आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांनी आदर्श आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी करून निवडणूक आयोगाचा लौकिक आणि प्रतिष्ठा जपली होती. दुर्दैवाने नंतरच्या काळात असे काही घडले नाही. राजीवकुमार, ज्ञानेशकुमार यांच्यासारख्या निवडणूक आयुक्तांनी आयोगाची प्रतिष्ठा धुळीस मिळवण्याचे काम केले आहे. या दोघांच्या काळात आयोगाने निष्पक्षपणे नव्हे तर सत्ताधाऱ्यांच्या मर्जीनुसार काम झाल्याचे चित्र तयार झाले आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी कर्नाटक, महाराष्ट्र आणि हरियाणा निवडणुकीतील गैरप्रकारांचा पर्दाफाश करून आयोगाचे वस्त्रहरण केले. २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसह अनेक निवडणुकांमध्ये आयोगाची भूमिका भाजपच्या सहकारी पक्षाप्रमाणे राहिल्याचे दिसून आले. पंतप्रधानांसह केंद्रीय मंत्री आणि सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी असंख्य वेळा आचारसंहितेचा भंग केला. अनेक राज्यांमध्ये दलित, अल्पसंख्याक मतदारांना मतदार केंद्रापर्यंत येऊ न देण्याचे प्रकार घडले; पण त्या बाबत आयोगाने काहीच कारवाई केली नाही. सदोष मतदार याद्या, बोगस मतदारांची नावे, मतदारांची नावे चुकीच्या पद्धतीने वगळणे, एकाच मतदाराचे अनेक बुथवर नाव असणे असे प्रकार उघडकीस आले आहेत. हरियाणाच्या मतदार यादीत ब्राझीलच्या मॉडेलचे नाव २२ ठिकाणी असल्याचे राहुल गांधींनी उघडकीस आणले. बिहार निवडणुकीच्या तोंडावर निवडणूक आयोगाने स्पेशल इन्सेंटिव्ह रिव्हिजनच्या नावाखाली मतदार यादी सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला. त्या विरोधात विरोधी पक्षांनी आवाज उठवला, रस्त्यावर उतरून आंदोलने केली, सुप्रीम कोर्टाचे दार ठोठावले; परंतु काही उपयोग झाला नाही.

जवळपास ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली. सुमारे २१ लाख नवीन मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आली. बिहारच्या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना योजनांचा 'लाभ' मिळाला की अधिकृत 'लाच' देण्यात आली? असा प्रश्न निर्माण झाला. त्याचे उत्तर मिळणे कठीणच आहे. आम आदमी पक्षाने लोकप्रिय घोषणा करून योजनांच्या माध्यमातून दिल्ली आणि पंजाबमध्ये मोठा विजय मिळवला तेव्हा पंतप्रधानांनी त्यावर 'रेवडी कल्चर' असे संबोधून जोरदार टीका केली होती. त्यानंतर मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातील निवडणुकांमध्ये भाजपने 'रेवडी कल्चर' आत्मसात करून निवडणुका जिंकल्या तेव्हा मात्र पंतप्रधान मोदी गप्प राहिले. बिहारमध्ये तर निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यावर सुमारे दीड कोटी महिलांच्या खात्यात प्रत्येकी १० हजार रुपये टाकले. सुमारे पावणे दोन कोटी कुटुंबाचे सव्वाशे युनिटपर्यंतचे वीज बिल माफ करण्यात आले. सुमारे १ कोटी १० लाख वृद्धांच्या पेन्शनमध्ये ४०० रुपये वाढ करून ती ११०० रुपये करण्यात आली. म्हणजेच सुमारे ४ कोटींहून अधिक मतदारांना विविध सरकारी योजनांच्या नावाखाली निवडणूक प्रक्रिया सुरू असताना ३० हजार कोटींचा आर्थिक लाभ देऊन मत मिळवत द्विशतकी आकडा ओलांडला. याला 'मतचोरी' म्हणायचे की 'रेवडी कल्चर'? विरोधी पक्षांनी या संदर्भात निवडणूक आयोगाकडे दाद मागितली; परंतु आयोगाने त्याकडे डोळेझाक करत सत्ताधाऱ्यांना मोकळीक दिली असेच म्हणावे लागेल. ही संपूर्ण प्रक्रिया पाहिल्यास हा योजनांचा लाभ नव्हता तर अधिकृतपणे जनतेचा पैसा वापरून मते खरेदी करण्याचा प्रकार होता. आता पूर्वीसारखे लपून छपून मतदारांना पैसे वाटण्याचे दिवस गेले असून, आता निवडणूक आयोगाच्या कृपेने सरकारी तिजोरीतून मते खरेदी करण्याचा नवा 'पॅटर्न' सुरू झाला अहे. अर्थात हा पॅटर्न लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. बिहारमध्ये सत्ताधारी भाजप आघाडीने जवळपास ९० टक्के जागा जिंकल्याचा पॅटर्न जितका अविश्वसनीय आहे तितकाच तो अस्वस्थ करणारा आणि लोकशाहीच्या भवितव्याबाबत धोक्याची घंटा वाजवणारा आहे. बिहारमधील निवडणुकीत विरोधी पक्षांनी विशेषत: काँग्रेसने मतचोरी, एमआयआरसारखे मुद्दे मांडले, यात्रा काढल्या; पण बिहारच्या जनतेने ते सारे नाकारल्याचे दिसले. इतके एकतर्फी आणि राक्षसी बहुमत मिळणे हे केवळ आश्चर्यकारक नाही तर लोकशाहीच्या मुलभूत तत्त्वांनाच प्रश्नांकित करणारे आहे.

## अॅड.मयूर आंधळे यांचा राज्यस्तरीय आदर्श कार्य गौरव पुरस्काराने सन्मान

**वडवणी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील रुई पिंपळा येथील युवा सरपंच अॅड.मयूर आंधळे हे सदैव सामाजिक कार्यात अग्रेसर असतात तरी त्यांनी आतापर्यंत केलेले सामाजिक कार्याची पावती म्हणून त्यांना जय भगवान प्रतिष्ठान च्या वतीने राज्यस्तरीय आदर्श गौरव पुरस्काराने डॉक्टर तात्याराव लहाने व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.**





वडवणी तालुक्यातील अत्यत डोंगर रागाच्या कुशीत असणाऱ्या रुई पिंपळा गावचे सरपंच मयूर आंधळे यांनी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचे माध्यमातून गावात विकासाचे नवे मापदंड निर्माण केले.असुन स्वच्छता अभियान, ग्रामविकास, रोजगार निर्मिती आणि शिक्षणासाठी त्यांनी घेतलेल्या उपक्रमांना शासन दरबारीं घेतली असुन त्यांनी आपल्या कार्यातून समाजात जागृती निर्माण केली आहे. ग्रामीण विकास, शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक समरसतेसाठी त्यांचे योगदान प्रेरणादायी आहे. त्यांच्या नेतृत्वातून आजची तरुण पिढी बदलाची दिशा घेत आहे गावच्या कार्यात झोकून देणाऱ्या तरुण नेतृत्वाचा सन्मान जय भगवान युवा प्रतिष्ठान यांनी राज्यस्तरावर केला असून, वडवणी तालुक्यातील पिंपळा गावचे तरूण, युवा सरपंच अॅड.मयूर शंकरराव आंधळे यांना आदर्श कार्यगौरव पुरस्कार २०२५जाहीर झालेला असुन ९ नोव्हेंबर ला दैत्यनांदूर येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये मध्ये हा सन्मान सोहळा पार पडला या सोहळ्याचे आयोजन मा. अजीनाथ भगवान दहिफळे (संस्थापक, जय भगवान युवा प्रतिष्ठान नांदूर) यांनी केले होते.

## माजलगाव येथे सात डिसेंबर रोजी ऊस परिषद-भाई थावरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील ऊस प्रश्न शेतकरी नेते भाई थावरे यांच्या नेतृत्वाखाली सात डिसेंबर रोजी माजलगाव येथे भव्य ऊस परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.**



भाई थावरे म्हणाले की, सध्या कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू झाला आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सर्व कारखान्यांवर ऊस नेऊन घातला आहे मात्र कारखानदारांकडून अजूनही उसाला भाव जाहीर केलं नाही. २६५ ऊस कारखान्यांनी स्वीकारावा असे आदेश साखर आयुक्तांनी काढले असतानाही साखर कारखाने शेतकऱ्यांचा २६५ जातीचा ऊस गाळपास घेत नाहीत. शुगर केन अॅक्टनुसार कारखान्यांनी ऊस गाळपास नेल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उसाचे पेमेंट देणे गरजेचे आहे मात्र याकडेही कारखानदार दुर्लक्ष करतात. कारखानदारांनी उसाचे पेमेंट वेळ करावे, शेतकऱ्यांच्या २६५ जातीचा ऊस गाळपास न्यावा. नसता डिसेंबर मध्ये होणाऱ्या ऊस परिषदेत कारखानदाराविरोधात आंदोलन करण्याचा निर्णय ऊस परिषदेत शेतकऱ्यांना घ्यावे लागेल असेही भाई थावरे यांनी म्हटले आहे.

## देवदहिफळ येथे खंडोबा म्हाळसाची तेल भंडारा लावून महापुजा

### दिंद्रुड च्या काटकर वाड्यात मानाची काठी उभा



**दिंद्रुड। प्रतिनिधी**

**श्री.मल्हारी माळसाकांत देवस्थान देवदहिफळ येथे श्री. खंडोबा घटस्थापना व तेल-हळद लावण्याचा कार्यक्रम (१८ रोजी) मंगळवारी दुपारी धार्मिक वातावरणात पार पडला. देवदहिफळ सह परिसरातील भाविक भक्तांची या प्रसंगी उपस्थिती होती.**

### दिंद्रुड येथील मानाची काठी ला तेल भंडारा

दिंद्रुड येथील काटकर परिवाराच्या वतीने देवदहिफळ येथील खंडोबा मंदिरात खंडोबा यात्रेनिमित्त मानाची काठी उभा केली जाते. मार्गशीर्ष शु. त्रयोदशी मंगळवारी या काठीला काटकर वाड्यात तेल भंडारा व महापुजा करत काठी उभा करण्यात आली असून पुढील आठ दिवस दररोज सायंकाळी आरतीचा वाजत गाजत कार्यक्रम करण्यात येतो. चंपाषष्ठीच्या आदल्या दिवशी दिंद्रुड ते देवदहिफळ वाजत गाजत या काठीचे प्रस्थान देवदहिफळ येथे करण्यात येते.

देवदहिफळ येथील खंडोबाचे अनादी काळापासून सुप्रसिद्ध जागृत देवस्थान आहे. मार्गशीर्ष चंपाषष्ठी ते मकर संक्रांत या काळात येथे मोठी यात्रा भरते. याच औचित्याने मंगळवारी दुपारी श्री खंडोबा व म्हाळसा या दैवताला तेल व भंडारा लावण्याचा धार्मिक कार्यक्रम देवदहिफळ ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आला. येथील मानकरी पुजारी बाळू जगताप यांच्या हस्ते महाअभिषेक करण्यात आला. याप्रसंगी देवदहिफळ व परिसरातील भाविक भक्त उपस्थित होते. बुधवार (दि.२६ रोजी) रोजी श्री खंडोबा व म्हाळसा यांचे लग्न सूर्योदयापूर्वी लावण्यात येईल. यानंतर जवळपास दीड महिन्याची यात्रा देव दहिफळ येथे भरणार असून त्याच्या नियोजन बैठकीचे आयोजन देवदहिफळ ग्रामस्थांच्या वतीने मंगळवारी सायंकाळी करण्यात आले होते. राज्यभरातून भाविक भक्त या यात्रेला उपस्थिती दर्शवतात.

## जिल्हाधिकारी मित्तल यांनी पालिका निवडणूक संदर्भात केली पाहणी

**अंबड । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज दि. १८ नोव्हेंबर रोजी अंबड नगर परिषद निवडणुकच्या अनुषंगाने भेट दिली व निवडणूक प्रक्रियेविषयी आढावा घेतला. नगर परिषद कार्यालय अंबड येथे नगर परिषद निवडणुकीसाठी प्राप्त अर्जांची आज रोजी छाननी सुरू होती. जिल्हाधिकारी यांनी या सर्व प्रक्रियेची पाहणी केली.**

यावेळी उप विभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी, तहसीलदार अंबड विजय चव्हाण, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मनोज उकिर्डे यांच्या सह अन्य निवडणूक विषयक अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना अधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक सर्व उपाययोजना प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना दिल्या. निवडणूक प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी उभारण्यात आलेले विविध कक्षांची त्यांनी पाहणी केली व नोडल अधिकारी यांना निवडणूक विषयक कामकाज चोखपणे पार पाडण्याबाबत निर्देश दिले.




जिल्हाधिकारी मित्तल यांनी निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यावर विशेष भर दिला. उमेदवार तसेच पक्ष कार्यकर्त्यांनी नियमांचे पालन करावे आणि प्रशासनाने कोणत्याही तक्रारींची तात्काळ दखल घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.या भेटीदरम्यान मतमोजणी कक्षाची व सुरक्षा कक्षाची पाहणी केली व मतदान केंद्रांची मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, कर्मचारी नियोजन, साहित्य उपलब्धता, संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांची स्थिती आदींचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. तसेच निवडणूक कालावधीत आचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी सर्वांनी घ्यावी हे निर्देश त्यांनी दिले.

**दादेगाव येथे मा.आ.सुरेश आणणा धस यांच्या प्रयत्नातून शेंबडा कोल्हे वस्तीसाठी नवीन १०० चा ट्रान्सफार्मर मंजूरी देऊन आज प्रत्यक्षात ट्रान्सफॉर्मर शेतकऱ्यांच्या स्वाधीन केला. छाया शरद रेडेकर**



## पान १ वरून...

### शेतकऱ्यांनो आज खात्याची

कंपनी, शेतकरी उत्पादक संघटना, सहकारी पतसंस्था, या ठिकाणी समारंभ शेतकऱ्यांना .. या लिंकवरून पाहता येणार आहे. दरम्यान, पीएम किसानच्या २० हप्त्याचे वितरण २ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. देशातील ९.७ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर २० हजार ५०० कोटी रुपये जमा करण्यात आले होते.

----------

### भाजपकडून फोडाफोडी ; शिंदेसेनेचा

नाही. चव्हाण यांनी राजू शिंदे, अद्वैय हिरे यांच्या हाती कमळ दिले. या दोन्ही नेत्यांनी गेल्याच वर्षी शिंदेसेनेचे नेते संजय शिरसाट आणि दादा भुसे यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. शिरसाट, भुसे विजयी झाले. दोघेही मंत्री झाले. पण त्यांच्या विरोधात लढलेल्या नेत्यांना गळाला लावून भाजपने योग्य तो संदेश शिंदे सेनेला दिलेला आहे. शिंदेसेनेचे आमदार, मंत्री असलेल्या मतदारसंघांमध्ये भाजपनं तगडे चेहरे आपल्याकडे घेत मिशन २०२९ ला सुरुवात केली आहे. शिंदेसेनेचे आमदार असलेल्या मतदारसंघांमध्ये भाजपनं पक्ष प्रवेश करुन घेतलेल्या नेत्यांची यादी मोठी आहे. छत्रपती संभाजीनगर पश्चिममध्ये संजय शिरसाट आमदार आहेत. ते विद्यमान मंत्री आहेत. त्यांच्या मतदारसंघात भाजपने राजू शिंदेंना गळाला लावले आहे. तर मंत्री दादा भुसे यांच्या विरोधात लढलेल्या अद्वैय हिरे यांचा पक्षप्रवेश आज संपन्न झाला आहे. ते बाह्य मालेगाव मतदारसंघातून भुसे यांच्या विरोधात विधानसभा लढले होते. पुरंदरमध्ये काँग्रेसकडून आमदार राहिलेल्या संजय जगताप यांना भाजपनं आपल्याकडे खेचलं आहे. तिथे शिंदेसेनेचे विजय शिवतारे आमदार आहेत. जालन्यात काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी कमळ हाती घेतले आहे. इथे शिंदेसेनेचे अर्जुन खोतकर आमदार आहेत. गोरंट्याल आणि खोतकर यांच्यात विळ्या भोपळ्याचं नातं आहे. अलिबागचे माजी आमदार पंडित पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. तिथे शिंदेसेनेचे महेंद्र दळवी आमदार आहेत. पाटणमध्ये शिंदेसेनेचे मंत्री शंभुराज देसाई यांच्या विरोधात निवडणूक लढवलेल्या सत्यजीत पाटणकर यांना भाजपनं प्रवेश दिला आहे. शिंदे सेनेच्या मतदारसंघांमध्ये भाजपने तुल्यबळ नेते गळाला लावले आहेत. या नेत्यांची यादी बरीच मोठी आहे. महाराष्ट्रात भाजपला कुबड्यांची गरज नाही, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले होते. त्यानंतर अवघ्या काही दिवसांत उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांचे पुत्र पार्थ पवार यांच्यामुळे अडचणीत आले. जमीन खरेदीच्या व्यवहाराने त्यांची गोची झाली. यानंतर आता शिंदेसेनेत अस्वस्थता वाढली आहे. भाजपने लावलेला पक्षप्रवेशांचा धडाका शिंदेसेनेसाठी अडचणीचा ठरत आहे.

----------

### बीडमध्ये हवाल्याचे रॅकेट

असल्याने ठिकठिकाणी चेक पोस्ट तैनात आहेत याशिवाय शहर जिल्हा पोलिसांकडून माहितीच्या आधारे तपासणी केली जात आहे. प्रामुख्याने ही केलेली कारवाई हे हवाल्याचे रॅकेट होते का हे मात्र सिद्ध झाले नाही. याशिवाय सध्या जिनिंगवर कापसाची आवक सुरू आहे. सोयाबीनचीही आवक सुरूच आहे, त्यामुळे हा त्या व्यवहारातील पैसा असल्याचीही चर्चा होत आहे.

------------

### दिल्ली बॉम्बस्फोट प्रकारणी

आणि उत्तम आर्थिक पार्श्वभूमीचे असल्याने तपास यंत्रणांची चिंता आणखी वाढली आहे. या प्रकरणाचा तपास आता निर्णायक टप्प्यात आहे. डिजिटल पुरावे, आर्थिक धागेदोरे आणि संवादांच्या तपशीलांचा आधार घेऊन आणखी काही जणांवर कारवाई होण्याची शक्यता नाकारण्यात येत नाही. तपास यंत्रणांनी अधिकृतरीत्या या प्रकरणावर बोलण्यास नकार दिला असला, तरी मुंबईतून तिघांना ताब्यात घेतल्याने तपास आणखी वाढणार आहे.

------------

### राज्यातील पाच आयएएस

करण्यात आली आहे. यामध्ये राहुल रंजन महिवालयांची महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे येथील व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रकाश खपलेआयुक्त, मृदा आणि जलसंधारण, छत्रपती संभाजी नगर यांची महाराष्ट्र राज्य मत्स्यव्यवसाय महामंडळ, मुंबई येथील व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.डॉ. मंजिरी मानोलकर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे यांची आयुक्त, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे. त्रिगुण कुलकर्णी उपमहासंचालक, यशदा, पुणे यांची अध्यक्ष, दहावी आणि बारावी बोर्ड, पुणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे. अंजली रमेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांची आयुक्त, मृदा आणि जलसंधारण, छत्रपती संभाजी नगर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

------------

### राज्यात थंडीचा

इशारा देण्यात आलेला होता. मंगळवारी धुळे येथे राज्यातील निचांकी ६.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर निफाड येथील गहू संशोधन केंद्रात ६.९ अंश तर जेऊर येथे ७ अंशाची नोंद झाली. जळगावातही ७.१ अंश सेल्सिअस तापमान होते. तर अहिल्यानगर येथे ८.४ अंश, नाशिक येथे ९.२ अंश सेल्सिअस मोहोळ येथे ९.३ अंश आणि मालेगावात ९.६ अंश तापमान होते. तसेचा गोंदीया आणि यवतमाळ येथे ९.६ अंशाची नोंद झाली होती. राज्यातील बहुतांशी भागात किमान तापमानात घट दिसून आली. कमाल तापमानही १ ते ३ अंशांपर्यंत घटले आहे. तापमानातील घट पुढील काही दिवस कायम राहू शकते, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

------------

### मुंबई महापालिका निवडणुकीत

मुंबई महापालिकेवर गेल्या दोन दशकांपासून शिवसेनेची सत्ता होती. मात्र महायुती एकत्र निवडणूक लढवल्यास समीकरण मोठ्या प्रमाणात बदलण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे. सातआठ वर्षांनंतर महानगरपालिकेच्या निवडणुका होत असल्याने स्थानिक स्तरावर तिकिटांसाठी मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. अनेक कार्यकर्त्यांना तिकीट अपेक्षित असल्याने काही ठिकाणी नाराजीही दिसून येते. या संदर्भात बोलताना बावनकुळे म्हणाले, अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत अनेकजण योग्य निर्णय घेतील. आमचे स्थानिक पदाधिकारी अपक्ष म्हणून उभे असलेल्या कार्यकर्त्यांशी सतत संवाद साधत आहेत. अनेकजण आपली उमेदवारी मागे घेतील, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे. म्हणजेच उमेदवारीवरून निर्माण झालेला तणाव हळूहळू निवळेल, असा विश्वास भाजपकडून व्यक्त केला जात आहे.

------------

### 'गॅस सिलिंडर'साठी

खंडपीठासमोर वंचितची याचिका सुनावणीसाठी आली. त्यावेळी, पक्षाच्या वतीने वकील प्रकाश आंबेडकर यांनी याचिका करण्यामागील कारण स्पष्ट केले. तसेच, याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली. गेल्या शुक्रवारी देखील याचिका सादर करण्यात आली होती व याचिकेवर तातडीची सुनावणी गरजेची असल्याचे सांगण्यात आले होते हे आंबेडकर यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने वंचितच्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला. महाराष्ट्र राज्य पक्ष नोंदणी, नियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण आणि वाटप) आदेशात नमूद केलेल्या अटींनुसार, एखाद्या नोंदणीकृत राजकीय पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (पंचायत समिती व्यतिरिक्त) मागील सार्वत्रिक निवडणुकीत एकूण जागांपैकी किमान पाच टक्के जागा जिंकल्या असतील किंवा त्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील एकूण जागांपैकी पाच टक्के जागा एका जागेपेक्षा कमी असतील आणि जर त्या पक्षाच्या उमेदवाराने किमान एक जागा जिंकली असेल, तर त्या पक्षाच्या विनंतीवरून, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी पक्षासाठी एक मुक्त चिन्ह तात्पुरते राखीव म्हणून घोषित केले जाईल. ते मुक्त चिन्ह त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत इतर कोणत्याही उमेदवाराला वाटप केले जाणार नाही.

------------

### जिसका चलेगा नोट उसको मिलेगा

आणि गेवराई या सहा नगरपालिकांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे या सहाही ठिकाणी महायुती किंवा महाविकास आघाडी अशी लढत होताना दिसत नाही. महायुती मध्ये वेगवेगळे उमेदवार उभा केल्याने या लढती अत्यंत तुल्यबळ होताना दिसत आहेत. बीड शहरातील जागा मागासवर्गीय महिलांसाठी राखीव आहे. बीडमध्ये किमान महायुती होईल अशी शक्यता होती. मात्र ऐनवेळी महायुती टाटा तोड झाली आणि भाजपाने या ठिकाणी उमेदवार उभा केला त्यासोबतच अंबाजोगाई परळी आणि माजलगाव या ठिकाणी देखील उमेदवार उभे केल्याने रंगदार निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र मतदाराच्या मनात काय आहे हे कोणीच जाणून घ्यायला तयार नाही. अशातच आता पक्ष आणि कार्यकर्ते जर निष्ठा विकत असतील तर कार्यकर्त्यांनीच प्रामाणिक करायचे अनेक ठिकाणी शिवसेनेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, अजित पवार गट यांच्यात बंडखोरी पाहायला मिळत आहे. या निवडणुकीमध्ये अनेक ठिकाणी नगराध्यक्ष पदाची उमेदवार हे सर्वसाधारण आहेत त्यांची आर्थिक बाजू भक्कम नाही अशावेळी नेतृत्व करणाऱ्या नेत्यानेच सर्व खर्च करावा, अशी अपेक्षा आहे. त्यातही आता कार्यकर्ते जो नोट देंगा उसे वोट मिलेगा, अशी चर्चा खाजगीत करताना दिसत आहेत. अशी परिस्थिती निवडणूक दरम्यान आणि मतदानावेळी राहिली तर सर्वसामान्य आणि आर्थिक बाजू कमकुवत असलेल्या उमेदवाराची परीक्षाच म्हणावी लागेल. अशी परिस्थिती केवळ बीड जिल्ह्यात किंवा मराठवाड्यात आहे असे नाही तर ही स्थिती राज्यभरात दिसून येत आहे.

--------------

### काँग्रेसने एकटे लढण्याच्या निर्णयाचा

दिला होता. कोरोना विषाणूच्या साथीच्या काळात उद्धव ठाकरे यांनी धर्मांमध्ये भेदभाव केला नाही आणि ठाकरेसेनेला विश्वास आहे की, मुस्लिम मते महाविकास आघाडीकडेच राहतील. जर काँग्रेसला वाटत असेल की स्वतंत्रपणे निवडणूक लढवून त्यांना १०० टक्के हिंदी भाषिक आणि मुस्लिम मते मिळतील, तर तसे होणार नाही. भाजपवर मुंबई तोडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत, पुढे म्हटले आहे की मुंबई ही केवळ महाराष्ट्राची राजधानी नाही तर देशाची आर्थिक राजधानी देखील आहे. भाजप पुरस्कृत बिल्डर लॉबी मुंबईच्या प्रभावाला कमकुवत करण्यासाठी काम करत आहे. अशा परिस्थितीत, सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. मराठी काँग्रेस नेत्यांना किमान हे लक्षात आले पाहिजे होते की, ही मुंबई आणि महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची लढाई आहे. भाजप आणि अदानी संस्कृतीविरुद्ध लढण्यासाठी विरोधी पक्षांनी एकतेचे महत्त्व दाखवणे आवश्यक आहे, असे ठाकरेसेनेने म्हटले. मुंबईत एकटे जाण्याचा निर्णय काँग्रेसचा आहे. आम्ही महाविकास आघाडी म्हणून एकत्र आहोत. राज ठाकरे यांच्या प्रवेशामुळे मराठी एकताच बळकट होईल. काँग्रेस उर्वरित २७ नागरी संस्थांमध्येही एकटे लढेल का? असा प्रश्न त्यांनी काँग्रेसला केला.

---------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. १९ नोव्हेंबर २०२५


## थोडक्यात



### तांबे सर यांच्या ओशन क्रिकेट अकॅडमीचे खेळाडू जिल्हा शालेय क्रिकेट स्पर्धेत चमकले

पाटोदा । प्रतिनिधी

अंबेजोगाई येथे आयोजित क्रिकेट स्पर्धा या शालेय शिक्षण क्रीडा विभाग व युवक सेवा संचालनालय पुणे महाराष्ट्र अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड याच्या अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या होत्या. या मध्ये पाटोदा तालुक्यातून वसंतराव नाईक विद्यालय यांचा ी १९ मुलांचं संघ व प्रियदर्शनी विद्यालय यांचा ी१७ मुलींचा संघाने अनुक्रमे द्वितीय व तृतीय येण्याचा मान मिळविला ही सर्व मुले व मुली डॉ सुशिल तांबे सर यांच्या ओशन क्रिकेट अकॅडमी पाटोदा येथे सराव करतात.

मुलांच्या संघात आयुष येवले, अविनाश शिंदे,आर्यन बनकर, गणेश थोरवे, संग्राम शिंदे, समर्थ दिक्षित, साईनाथ बांगर, प्रवीण दराडे, तेजस छोले,कृष्णा नाईकनवरे , गायकवाड विश्वजीत यांचा समावेश होता तर मुलींच्या संघात शेवाळे नाविन्य, गायकवाड गौरी , ज्ञानेश्वरी जायभाय, गायकवाड साक्षी, आस्था माने, बोराटे सृष्टी, जाधव अकशरा, हुले तनुजा, नारायनकर आकांगशा, घुमरे प्रणिती , शेवंते सोनाली ,दगडे उत्कर्षा व सरोदे अनुष्का यांचा समावेश होता. सर्व खेळाडूंचे जिल्ह्यातून कौतुक होत आहे.



### शेकटा शालेय शिक्षण समिती बिनविरोध

**अध्यक्ष भाऊसाहेब महानोर तर उपाध्यक्ष राधा हाके**

चकलांबा । प्रतिनिधी

शालेय पुनर्गठण समितीची यावेळी करण्यात आली सर्व पालकांनी मोठे मन करून बिनविरोध निवड याठिकाणी करण्यात आली अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडला त्यामुळे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे. यावे सर्व पालकांनी उपस्थिती दाखवली या समिती साठी सानप सर केंद्र प्रमुख म्हूणन उपस्थिती होते

तसेच मुख्यध्याक वाघ मॅडम, कांबळे मॅडम, बडे सर, काशीद सर, सिरसाट सर, तुकाराम सर, गिरी सर, नागरगोजे सर, सरपंच सुनील शेंबडे, उपसरपंच नारायण महानोर उपस्थिती होते यावेळी बिनविरोध अध्यपदी पत्रकार भाऊसाहेब महानोर तर उपाध्यक्ष पदी राधा भरत हाके यांची निवड झाली सदस्य म्हणून, गोवर्धन थोरात, तुकाराम शेंबडे, मधुकर हापटे, राजेंद्र महानोर, अमोल साळवे, शरद महानोर, बाबासाहेब डोईफोडे, गीता महानोर,शिवाजी शेंबडे, रमजान पठाण, विलास माने यावेळी यांची सदस्य पदी निवड झाली असून खालील गावकरी उपस्थिती होते.पोलीस प्रशासन चे प्रधान सर, राजेश रायकर,भाऊ कर्डीले, योगीराज महानोर,परमेश्वर शेंबडे, गिरी अर्जुन, गणेश हाके,भरत महानोर, शहादेव नरुटे, भाऊ हापटे, आसाराम पारेकर, महादेव महानोर,

## पोलिस अधीक्षक यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सपोनि निलंगेकर, उपनिरीक्षक अन्नालदास सह पोलीस सन्मानित

तलवाडा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गुन्हेगारी वाढत होती कायदेचा धाक कोणालाही नव्हता पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत आल्यापासून गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिस अधिकारी, वर कर्मचारी यांना पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी अलर्ट राहण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये एक क्यू आर कोड ठेवण्यात आला आहे. जेणेकरून कोणत्याही घटनेची व कोणत्याही तक्रारीची तात्काळ अंमलबजावणी व्हावा यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जाहीर केलेले आहे. त्यांच्या माध्यमातून अनेक गुन्हे दाखल होत आहे.

सविस्तर तलवाडा पोलिसांनी अवघ्या २४ तासांतच अपहरण झालेल्या मुकादम रवींद्र पाटोळे यांची सुटका करून धाडसी कारवाई केली आहे. या वेगवान आणि यशस्वी ऑपरेशनबद्दल पोलिसांचे



सर्वत्र कौतुक होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रवींद्र पाटोळे हे सामाजिक कामानिमित्त तलवाडा येथे आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात सहकाऱ्यांसोबत चहा घेत असताना बगेवाडी येथील नऊ जणांनी त्यांच्यावर झडप घालत मारहाण केली आणि जबरदस्तीने चारचाकीत बसवून नेले. त्यानंतर अपहरणकर्त्यांनी त्यांना टाकरवन–माजलगाव मार्गे तेलगाव,

कारी फाटा ओलांडून कासारी गावातील डोंगर दऱ्यातील शेतातील गोठ्यात डांबून ठेवले होते सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपाचे चक्र उपनिरीक्षक कैलास अन्नलदास, पोह शेख मोहसिन, पो. अंजन गडदे,पोह नारायण काकडे,आणि पो. सुग्रीव रुपनर यांनी सरकारी वाहनासह कासारी गाव गाठले. डोंगर दऱ्या, काटेरी झुडपे आणि चिखलातून

पायी प्रवास करत त्यांनी बडे यांच्या शेतातील गोठ्यात पोहोचून रवींद्र पाटोळे यांची सुखरूप सुटका केली. संपूर्ण कारवाई सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. २४ तासांतच अपहरणाचा थरार संपवून सुटका केल्याबद्दल तलवाडा पोलीसांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सपोनि मनोज निलंगेकर, उपनिरीक्षक कैलास अन्नालदास,पोहा शेख मोहसीन,पोह अंजन गडदे, पोह नारायण काकडे,पो.चालक सुग्रीव रुपनर, यांना सन्मानित केले आहे

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची ई–केवायसी करण्यास ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ –बाजीराव ढाकणे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील हजारो लाडक्या बहिणीची ई – केवायसी करणे बाकी होते या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार साहेब आणि महिला व बालविकास मंत्री आदरणीय अदितीताई तटकरे यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना संपूर्ण राज्यात



अतिशय यशस्वीरित्या राबवली जात आहे. पण या योजने बाबत दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी सर्व लाभार्थ्यांनी ई – केवायसी प्रक्रिया करावी अशा सूचना राज्य सरकारच्या वतीने यापूर्वी देण्यात आल्या होत्या. या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि महिला व बालविकास मंत्री आदरणीय अदितीताई तटकरे यांच्याशी वेळोवेळी पाठपुरावा करत या योजनेची ई–केवायसी करण्यास मुदतवाढ देण्याची मागणी महाएनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक तथा लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी केले होती.

कारण महाराष्ट्र राज्यात गेल्या काही दिवसांत आलेल्या नैसर्गिक आपत्ती आणि इतर अडचणींमुळे, ' मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण ' योजनेतील अनेक पात्र भगिनींना इ – केवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आली नाही, याची कल्पना संबंधितांच्या लक्षात आणून दिली असता त्यांनी तातडीने उचित ठरेल अशी कारवाई करत मुदतवाढ दिली आहे. या अडचणींची गांभीर्याने नोंद घेत राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. याबद्दल महाएनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक तथा लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी राज्य सरकारचे आभार मानले आहेत.

लाडकी बहीण योजनेची श–घधउ करण्याची अंतिम मुदत आता ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच ज्या पात्र लाभार्थी महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे. त्या लाभार्थी महिलांनी स्वतःचीच ई – केवायसी करावी व त्यांचे पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र किंवा घटस्फोट प्रमाणपत्र किंवा मा. न्यायालयाचे आदेश याची सत्यप्रत संबंधित जिल्ह्यातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे जमा करावे. असे राज्य सरकारने जाहीर केले आहे. या निर्णयामुळे योजनेच्या लाभाची सातत्यता आणि अखंडितता कायम राहणार आहे. ज्या भगिनींनी अद्याप इ – केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांना विनंती आहे की त्यांनी या विस्तारित मुदतीचा लाभ घेत ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी असे आवाहन लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.

पान ६ वरुन...

### वन विभागाने बिबटे

स्थलांतर करा. सुलेमान देवळा परिसरासह आष्टी तालुक्यात अनेक भागात बिबट्याची दहशत आहे. हे आम्ही तालुका वनाधिकारी म्हणून आपल्या वेळोवेळी निदर्शनात आणून दिले आहे. आपण मात्र याकडे डोळा झाक पद्धतीने पाहत आहात, म्हणुन वरील कोणताही घटना वाढल्यास त्या अधिक रक्कम व गुन्हा संबंधित आष्टी व विभागाचे अधिकारी यांच्यावर दाखल करण्यात यावा. तुमचा प्राणी तुम्ही त्याचा बंदोबस्त करा. अशी मागणी समाजसेवक परमेश्वर घोडके यांनी केली आहे

### जिल्हाधिकारी व पोलीस

नवनीत कॉवत (भापोसे), अपोअ अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके, सचिन पांडकर, अपोअ बीड, उविपोअ गेवराई अनिल कटके, उविपोअ माजलगांव श्री. शैलेश गायकवाड, पोनि स्थागुशा शिवाजी बंटेवाड, यांचे मागदर्शनाखाली पो.नि. राहुल सुर्यतळ, पोउपनि केरबा माखणे, माधव तोटेवाड, संतराम थापडे, राम भंडाणे, माधव बहीरवाळ, सचिन मस्के सर्व पो.स्टे. माजलगांव शहर तसेच सपोनि संदिप पाटील, पोअं/सोमनाथ कुलकर्णी, अमोल येळे, अरुण राउत, हनुमंत इंगोले, संदीप गायकवाड सर्व पो.स्टे. चकलंबा तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, अंकुश वरपे, विकास राठोड, गोविंद राख, नितीन वडमारे, युनुस बागवान नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या, खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर, बेकायदेशीर जुगार व लॉटरी चालवणारे व्यक्तीवर जास्तीत जास्त व कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत (भापोसे) यांनी दिले आहेत.

### कासारी येथे सदगुरु

६ वाजता शेवटची कुस्ती ५ हजार रुपयांची परभणीच्या वैभव खटींग व देवदहिफळच्या लखन बडे यांच्यासोबत खेळवण्यात आली. लखन बडे व वैभव खटींग यांचा विजय घोषीत करतांना पंचानी संभ्रमावस्थेत समसमान बक्षीसाचे वाटप लखन व वैभवला दिले. बाळासाहेब बडे, सदाशिव बडे, बाबासाहेब तिडके, सरपंच दौलत बडे,माजी सरपंच शामसुंदर बडे,सुजात सय्यद, भगवान बडे गुरूजी, रमेश बडे यांनी पंचाची भुमिका निभावली. कल्याण घूले, मनोहर बडे, दत्तात्रय बडे, मधुकर बडे, गजानन जोशी ,दत्ता केंद्रे, अंकुश बडे ,सुनील बडे, अक्षय बडे, गोरख बडे, ज्ञानोबा बडे, समाधान बडे, कैलास बडे, सतीश तंबूड, दीपक घुले, विठ्ठल बडे आदी कमिटी समितीच्या वतीने या दंगलीचे नियोजन करण्यात आले. मातीतील कुस्तीत बाळासाहेब चौरे ची विवेक शेंडगे सोबत, धनराज केंद्रेची सोनू पवार,पृथ्वीराज वनवे ची खाजा शेख सोबत झालेली कुस्ती विशेष लक्षवेधी ठरली.

### शंभरचिरा ते पाटोदा

प्रशासनाने निष्क्रियता चालू ठेवली तर आम्ही पाटोद्याचा आवाज संपूर्ण जिल्ह्यात पोहोचवू. १६ नोव्हेंबर रोजी तहसीलदार व PMGSY अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनावर राष्ट्रवादी शेतकरी तालुकाध्यक्ष आनंद जाधव, उभाठा तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे, काँग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव, भाई विष्णुपंत घोलप, मुखराम पठाण, रियाज सय्यद, महादेव जाधव, सय्यद आमेर, सय्यद यासीन, सय्यद अर्षद, राजेंद्र जाधव यांच्यासह २६ कार्यकर्त्यांनी सह्या करून उपोषणाला ठाम समर्थन दिले आहे. स्थानीय नागरिकांचे म्हणणे स्पष्ट एका महिन्यात रस्ता उखडतो, म्हणजे भ्रष्टाचार कोणत्या थराला पोहोचला आहे, हे सांगायला शब्द लागत नाहीत.प्रशासन जागे झाले नाही, तर लढा आणखी उग्र होईल! ५ डिसेंबरच्या आंदोलनाने पाटोद्यातील बोगस रस्त्याच्या घोटाळ्यावरचा पडदा हटवून प्रशासनाला घाम मात्र नक्की फुटवणार

### अंबाजोगाईत नगराध्यक्ष

असून नंदकिशोर मुंदडा यांचे चिरंजीव अक्षय मुंदडा हे समाजकारणापेक्षा वरच्या राजकारणात जास्त लक्ष घालत असल्याने विकास कामे होण्यास विलंब लागत आहे. अनेक विकासाची कामे रखडली असून केवळ वरचे राजकारण करायचे अशी पद्धत आता सुरू झाल्याने मूळ समस्यांना हात न लावता केवळ भक्केबाजी राजकारण सुरू आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या वॉर्डातील समस्या सोडवल्या जातील काय? अशी शंका नागरिक व्यक्त करीत आहेत.

## मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

### सामाजिक कार्यकर्ते सज्ञाद सय्यद यांची मागणी

पाटोदा प्रतिनिधी

पाटोदा शहरातील मोकाट आणि भटक्या कुत्र्यांची वाढ दिवसेंदिवस भयावह स्वरूप धारण करत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ, शाळा परिसर, क्रांतीनगर, तसेच वसाहती भागात भटक्या कुत्र्यांचे थवे मुक्तपणे फिरताना दिसत आहेत. यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या शाळकरी मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच वर्गातील लोक त्रस्त झाले आहेत.

शहरातील अनेक ठिकाणी भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याच्या तसेच चावण्याच्या घटना घडल्या असून नागरिकांचा संताप वाढत चालला आहे. रात्रीच्या वेळी बाहेर पडणे तर अनेकांसाठी धोकादायक बनले असून, काही ज्येष्ठ नागरिक व महिला सकाळ–संध्याकाळची फिरणे बंद करण्यास मजबूर झाले आहेत. रस्त्यांच्या कडेला वाढलेल्या कुत्र्यांच्या संख्येमुळे वाहतुकीतही अडथळे निर्माण होत असून अपघातांची शक्यता वाढली आहे.

स्वच्छ भारत अभियानाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता आणि शहरी नियंत्रणाची चर्चा जोरात असताना, शहरातील भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यात नगरपंचायत प्रशासन अपयशी ठरल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे. नगरपंचायतीकडून अद्याप कोणतीही ठोस मोहिम, निर्बंधात्मक उपाययोजना किंवा भटकी प्राणी निवारा केंद्राबाबतचा निर्णय जाहीर झालेला नाही. सामाजिक कार्यकर्ते सज्जाद सय्यद यांनी नगरपंचायतीला तात्काळ कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या त्रासामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत आहे. प्रशासनाने तत्काळ श्वाननियंत्रण मोहीम राबवून शहरातील भीतीचे वातावरण दूर करावे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे ही नगरपंचायतीची जबाबदारी आहे. शहरातील नागरिकांनीही सोशल मीडियावरून वारंवार शासनाकडे मागणी करत, पाटोद्यात वाढत चाललेल्या या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात असे. सांगितले आहे. व नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे. यासाठी प्रशासनाने ठोस आणि कार्यक्षम पावले उचलावे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा संचालक सेवा सोसायटी पाटोदा सय्यद सज्जाद यांनी केले आहे.

## छत्रपती सहकारी साखर कारखाना, सावरगाव यांना ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-२०२५ पुरस्कार जाहीर

**माजलगाव । प्रतिनिधी**

ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सहकार मंथन २०२५' उपक्रमांतर्गत सहकार क्षेत्रात उत्कृष्ट व मोलाचे योगदान दिल्याबद्दल छत्रपती सहकारी साखर कारखाना, सावरगाव यांना ग्रीन वर्ल्ड को. प्राईड–२०२५ हा मानाचा व प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे. कारखान्याच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची, नाविन्यपूर्ण उपक्रमांची आणि पर्यावरणपूरक कामकाजाच्या ध्येयधोरणांची ही अधिकृत दखल मानली जात आहे. या पुरस्काराचे वितरण दि.२१ डिसेंबर रोजी पुणे येथे होणार आहे.

कारखान्याने गेल्या काही वर्षांत ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हितसंवर्धनावर भर देत उत्पादनातील पारदर्शकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, ऊसाला दिलेला स्पर्धात्मक दर, यांसारख्या उपक्रमांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. या सर्व उपक्रमांचा समन्वय साधत कारखान्याने सहकार क्षेत्रात आदर्श स्थान निर्माण केले आहे. या यशाची दखल घेत वरील संस्थांकडून कारखान्यास प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून याबद्दल चेअरमन बाजीराव जगताप तसेच व्हा. चेअरमन मोहनराव जगताप, व्यवस्थापन मंडळ, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी व कर्मचारी वर्गात समाधानाची भावना व्यक्त होत आहे. सहकाराच्या बळावर घेतलेली कारखान्याची ही झेप प्रेरणादायी असल्याचे मत विविध स्तरांतून व्यक्त केले जात आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कारखान्याचे व्यवस्थापन मंडळ, सर्व सभासद, अधिकारी–कर्मचारी आणि हितचिंतकांचे सर्व स्तरांतून मनःपूर्वक अभिनंदन होत आहे.

## दोन दिवसीय मोंगर्लिंग खंडोबा यात्रा महोत्सवाचे आयोजन

**यात्रा महोत्सवास भाविक–भक्तांनी उपस्थित राहावे –शिवराज महाराज भरडे, २७ नोव्हेंबरला होणार जंगी कुस्त्यांचा सामना**

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोगरा येथील जागृत देवस्थान मोंगर्लिंग खंडोबा यात्रेचे दि २६ व २७ नोव्हेंबर रोजी दोन दिवशीय मात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन या दोन दिवसीय यात्रा महोत्सवामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असुन दि २७ नोव्हेंबर रोजी जंगी कुस्त्यांचा समना होणार असून या दोन दिवशीय यात्रा महोत्सवास भावीक– भक्तांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मोंगर्लिंग खांडोबा जागृत देवस्थानचे विश्वस्त शिवराज महाराज भरडे यांनी केले आहे.

माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील जागृत देवस्थान मोंगर्लिंग खंडोबा यात्रेचे दि २६ नोव्हेंबर व दि २७ नोव्हेंबर रोजी





दोन दिवशीय यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन दि १८ नोव्हेंबर मंगळवार रोजी देवाची घटस्थापना होणार असून दि २५ नोव्हेंबर रोजी नागदिवे तर दि २६ नोव्हेंबर रोजी यात्रा प्रारंभ होणार असून यामध्ये सकाळी ११:०० वाजता गाड्या ओढणे, त्यानंतर देवाचा विवाह सोहळा होणार असुन दुपारी १२:१० वाजण्याच्या सुमारास देवाचा पालखी सोहळा व सबिना निघेल आणी त्यानंतर डोहातील झारी व भंडारा काढण्याचा कार्यक्रम होईल,त्यानंतर महाप्रसाद होईल तर दि २७ नोव्हेंबर सकाळी ११:०० वाजता वारु व नांगर तोडण्याचा कार्यक्रम होणार असुन या दोन दिवशीय यात्रा महोत्सवाचा जंगी कुस्त्यांनी सांगता होईल तरी मोगरा,शुक्ल तिर्थ लिमगाव,डाकेप्रिंपी,आनंदगाव, निपाणी टाकळी,खरात आडगाव तालुक्यातील सर्व भाविक भक्तांनी या दोन दिवशीय यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मोंगर्लिंग खंडोबा जागृत देवस्थानचे विश्वस्त शिवराज महाराज भरडे यांनी केले आहे.

### अशोक डकांची जंगी कुस्त्यांसाठी १ लाख ११ हजारांची देणगी

मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांनी मोंगर्लिंग खंडोबा यात्रा दोन दिवसीय महोत्सवासातील दि २७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या जंगी कुस्त्यांसाठी देवस्थान समितीकडे १ लाख ११ हाजारांची देणगी सुपूर्द करण्यात आली आहे.

### यात्रा महोत्सवात शेवटची कुस्ती ५१ हजारांची होणार

तालुक्यातील मोगरा येथील जागृत देवस्थान मोंगर्लिंग खंडोबा देवस्थानच्या दोन दिवसीय यात्रा महोत्सवाची सांगता दि २७ नोव्हेंबर गुरुवार रोजी जंगी कुस्त्यांच्या समानाने होणार असून शेवटची कुस्ती हि ५१ हाजारांची होणार असुन या कुस्त्यांचे बक्षीस वितरण मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांच्या हस्ते होणार आहे.

## रुपेश बोरगावकर यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या केज तालुकाध्यक्षपदी निवड

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील युवानेते तथा खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचे कट्टर समर्थक माजी सरपंच रूपेश बोरगावकर यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस(श.प)च्या केज तालुकाध्यक्ष पदी निवड झाली असुन कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक आघाडीच्या संघटनात्मक बांधणीस गती देण्यासाठी केज तालुक्यात नवीन पदनियुक्ती करण्यात आली असुन यामध्ये युसूफवडगांव येथील रूपेश बोरगावकर यांची पक्षाच्या विचारधारे प्रतीनिष्ठा ठेऊन त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम केले आहे.या सोबतच त्यांनी युवकांना राजकारण व समाजकारणत सहभागी करून घेण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.त्यांच्या



याच कार्याची दखल घेऊन पक्षश्रेष्ठींनी त्यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या केज तालुका अध्यक्ष पदी निवड केली असुन या नियुक्तीनंतर रूपेश बोरगावकर यांनी पक्षश्रेष्ठी प्रती कृतज्ञता व्यक्त केली असुन आगामी काळात केज तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढवण्यासाठी व युवकांना राजकीय व सामाजिक क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते रूपेश बोरगावकर यांना निवडीचे पत्र देण्यात आले त्यांच्या या निवडी बद्दल तालुक्यातील पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते व युवकांनी आनंद व्यक्त करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मध्य प्रदेश सरकारने सोयाबीनचा भाव फरक दिला

## महाराष्ट्रात मात्र आणखी खरेदीच सुरू



पुणे : महाराष्ट्रात सोयाबीन खरेदीची प्रक्रिया कासव गतीने सुरु असताना शेजारच्या मध्य प्रदेश सरकारने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये भावांतर योजनेंतर्गत भावफरक जमा केला आहे. त्यामुळे राज्यातील महायुती सरकार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणार कधी, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत.

राज्यातही सोयाबीन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी भावांतर योजना राबवावी, अशी मागणी शेतकऱ्यांची सुरुवातीला होती. परंतु राज्य सरकारने खरेदीची सक्षम यंत्रणा नसताना हमीभाव खरेदी केंद्राचं घोडं दामटलं. त्यामुळे हमीभाव केंद्रावरील नोंदणीच्या सुरुवातीपासूनच गोंधळ पाहायला मिळाला. राज्यातील प्रमुख बाजारात सोयाबीनचे दर हमीभावापेक्षा कमी आहेत. नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून सोयाबीनची हमीभाव खरेदी १५ नोव्हेंबरपासून सुरु झाली आहे. राज्य सरकारने सोयाबीन खरेदीची जिल्हानिहाय हेक्टरी उत्पादकता जाहीर केली आहे. परंतु नोंदणी करूनही खरेदीची तारीख शेतकऱ्यांना कळवण्यात आली नसल्याचे शेतकरी सांगतात. तसेच हमीभाव केंद्रावरील निकषांनुसार मालाची गुणवत्ता असेल तरच हमीभाव मिळतो, असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. महाराष्ट्रात हा गोंधळ सुरु असतानाच मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या सरकारने मात्र भावांतर योजनेंतर्गत १.३३ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २३३ कोटी रुपयांची रक्कम वर्ग केली आहे. नुकतीच मध्य प्रदेशच्या देवास येथे मुख्यमंत्री डॉ. यादव यांनी सभा आयोजित केली. त्यावेळी ते म्हणाले, ''आमच्या सरकारने या योजनेची सुरुवात केल्यानंतर केवळ १५ दिवसांतच शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पूर्ण केले आहे. शेतकऱ्यांना एमएसपीची हमी देण्यासाठी भावांतर योजना लागू करणारे मध्य प्रदेश हे देशातील पहिले राज्य आहे.'' असेही मुख्यमंत्री डॉ.यादव यांनी सांगितले. तसेच राज्यातील ९ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी या योजनेत नोंदणी केली असून आता १५ जानेवारीपर्यंत बाजारात सोयाबीनची विक्री करता येणार आहे, असे मुख्यमंत्री डॉ, यादव म्हणाले. तसेच भरड धान्यावर प्रति क्विंटल १ हजार रुपये बोनस दिला जात आहे. तर धान आणि गहू उत्पादक शेतकऱ्यांनाही बोनसचा लाभ मिळाल्याचा दावा मध्य प्रदेश सरकारने केला आहे.

# 'या'जातीची शेळी पाळा अन् कमवा मोठा नफा कमवा


सध्या शेळीच्या ठेंगण्या किंवा लहान जातीचे पालन करण्याची क्रेझ शेतकऱ्यांमध्ये वाढत आहे. कारण या शेळ्यांची काळजी घेण्यासाठी फारशी मेहनत घ्यावी लागत नाही. आणि या शेळ्या कमी खर्चात सुद्धा चांगला नफा देतात. अशीच एक शेळीची जात आहे 'नायजेरियन वार्फ'. शेळीची ही जात दिसायला अगदी लहान असली तरी नफा देण्याच्या दृष्टीने इतर जातीच्या शेळ्यांपेक्षा खूपच सरस आहे, आणि या शेळ्यांच्या संगोपनात फारसा पैसा खर्च करावा लागत नाही.

शारीरिक ठेवण : नायजेरियन वार्फ शेळी ही पश्चिम आफ्रिकन वंशाची शेळीची जात आहे. या शेळ्या खूप मजबूत आणि काटक असतात. या शेळ्या सुमारे १० वर्षे जगतात. नावाप्रमाणेच या शेळ्या उंचीला ठेंगण्या आणि काळ्या, पांढऱ्या, तपकिरी, लाल आणि सोनेरी अशा विविध असतात. पूर्ण वाढ झालेल्या शेळीचे सरासरी वजन १७ ते २५ किलोपर्यंत असते, लांबी २४ ते ३० इंच असते आणि उंची १६ ते २० इंच असते.प्रजोत्पादन माहिती : नायजेरियन वार्फ शेळ्यांचा प्रजनन दर इतरांपेक्षा जास्त असतो. ते वर्षभर प्रजनन करू शकतात. एक शेळी सरासरी २ ते ४ पिलांना जन्म देते. ते साधारण ६ ते ७ महिन्यांत माजावर येतात आणि दूध देऊ लागतात. या शेळयांचा गर्भधारणा कालावधी १४५ ते १५३ दिवसांचा असतो.

सर्वाधिक दूध उत्पादन क्षमता : नायजेरियन ड्वार्फ शेळी ही मांस आणि दूध उत्पादनासाठी सर्वोत्तम जात मानली जाते. इतर शेळयांच्या शरीराच्या आकाराच्या तुलनेत जास्त दूध उत्पादक आहेत. ही शेळी दररोज १.८ ते २ लिटर दूध देते. याशिवाय त्याचे मांसही बाजारात चांगल्या दराने विकले जाते. त्यांचे पालन करून शेतकरी बांधव दर महिन्याला बंपर नफा मिळवू शकतात.संगोपन : या शेळ्यांसाठी तुम्ही बांधलेले आवार अतिशय स्वच्छ असावे. वेंटिलेशन प्रणाली आणि सांडपाण्याचा प्रवाह चांगला असावा. शेळ्यांना पुरेशा प्रमाणात पोषक आहार देण्याचा प्रयत्न करा. त्यांना हिरव्या भाज्या खाऊ घालणे खूप फायदेशीर आहे. याशिवाय या शेळ्यांना पुरेसे पाणी द्यावे लागते.



# आडसाली उसाचे पाचट काढण्याचे हे आहेत फायदे



ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे : उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.

उस पाचट काढताना घ्यायची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. ऊस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही.

बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये : फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते. उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.

# जाणून घ्या रब्बी कांदा लागवडीची पद्धत



रब्बी कांदा हे महाराष्ट्रातील व्यापारीदृष्ट्या एक महत्त्वाचे पीक आहे. अन्य हंगामापेक्षा रब्बी हंगामात कांदा पिकाखालील क्षेत्र अधिक असून, उत्पादनही जास्त येते. साठवणीसाठीही रब्बी कांदा चांगला टिकतो. दरवर्षी मे ते ऑगस्ट या महिन्यात कांद्याला दर कमी असतात. त्या काळात विकण्यापेक्षा कांदा साठवून योग्य वेळी विक्रीला काढल्यास दर चांगला मिळू शकतो. रब्बी हंगामातील कांदा काढणी झाल्यानंतर पातीची व कांद्याची सुकवण शेतातच करावी. सुकवलेला कांदा साठवणीत चांगला टिकतो.

हवामान : कांदा हे मुख्यतः थंड (हिवाळी) हवामानातील पीक आहे. कांदा वाढीच्या सुरुवातीच्या काळात १० ते १५ अंश सेल्सिअस, कांदा पोसण्याच्या काळात २० ते ३० अंश सेल्सिअस आणि काढणीच्या काळात ३० ते ३५ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक असते. त्याला ११ ते १२ तास सूर्यप्रकाश जोड मिळाल्यास कांद्याची वाढ चांगली होते. असे हवामान साधारणपणे रब्बी हंगामात मिळत असल्याने या हंगामात कांद्याचे उत्पादन व प्रत चांगली मिळते.

जमीन : कांद्यासाठी उत्तम निचऱ्याची मध्यम ते भारी जमीन लागते. हलक्या मुरमाड जमिनीत सेंद्रिय खतांचा पुरवठा चांगला असेल तर उत्पादन चांगले येते. पाणी दिल्यानंतर कडक बनणाऱ्या भारी जमिनीत कांदे व्यवस्थित पोसत नाहीत, म्हणून मऊ व भुसभुशीत जमीन निवडावी. उत्तम वाढीसाठी जमिनीचा सामू ६.५ ते ७.० या दरम्यान असावा.

रब्बी हंगामासाठी सुधारीत जाती :पांढऱ्या रंगाच्या जाती- अकोला सफेद, फुले सफेद, भीमा श्वेता, पुसा व्हाईट फ्लॅट, पुसा व्हाईट राउंड. लाल रंगाच्या जाती- एन-२-४-१, एन-५३, बसवंत-७८०, ॲग्रीफाउंड डार्क रेड, पुसा रेड, ॲग्री फाउंड लाईट रेड, भीमा रेड, भीमा शक्ती, भीमा किरण, अर्का निकेतन.

लागवडीचा कालावधी : नोव्हेंबर - डिसेंबर

लागवड : रोपांची पुनर्लागवड डिसेंबर-जानेवारी महिन्यात सपाट वाफ्यात करावी. जरी सरी वरंब्यावर कांद्याचा आकार मोठा होत असला तरी सपाट वाफ्यात रोपांचे प्रमाण जास्त राहते. परिणामी मध्यम आकाराचे व एकसारखे ंदे मिळतात. वाफा ३ ते ५ मीटर लांब आणि २ ते ३ मीटर रुंद असावा. वाफ्यात पाणी देवून घ्यावे. त्यात रोपांची लागवड करून नंतर पाणी दिले तर रोपे चांगली जगतात. लागवड १० बाय १० सें.मी. दोन रोपांतील व झाडांतील अंतर ठेवून करावी. काही शेतकरी कांद्याची लागवड मजुरांच्या टंचाईमुळे मुख्य शेतात बी फेकूनही करतात. मात्र, रोपवाटिकेमध्ये रोपे तयार करून केलेल्या पुनर्लागवड पद्धतीमध्ये उत्पादन व कांद्याची प्रत ही अधिक चांगली आढळली आहे.

अन्नद्रव्य व्यवस्थापन : हेक्टरी ८ ते १० टन चांगले कुजलेले शेणखत आणि १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश देण्याची शिफारस आहे. यापैकी अर्धे नत्र व पूर्ण स्फुरद व पालाश लागवडीच्या वेळी द्यावा. राहिलेले नत्र लागवडीनंतर ३० दिवसांनी द्यावे.

सोबतच ३० किलो गंधक मात्रा लागवडीच्या वेळी द्यावी. नत्राची मात्रा अर्धी करून खतांसोबत ५ किलो ॲझोटोबॅक्टर देण्याची शिफारससुद्धा करण्यात आलेली आहे.पाणी व्यवस्थापन : जमीन, हवामान, हंगाम यावर कांदा पिकातील पाण्याच्या पाळ्या अवलंबून राहतात. पाणी वाफ्यात साचणार नाही, याची काळजी घ्यावी. पाण्याचा जादा ताण बसल्यास कांदा पोसत नाही. रब्बी हंगामात ८ ते १२ दिवसांच्या अंतराने १५ ते २० पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. कांदा काढणीपूर्वी तीन आठवडे पाणी तोडावे. ५० टक्के माना पडल्यानंतर व त्या पिवळ्या रंगाच्या झाल्यावर कांदा काढणीस सुरुवात करावी.

कांद्यावरील रोग व किडी : कांद्यावर जांभळा करपा, काळा करपा, काळी बुरशी, रोप कोलमडणे या प्रमाणे रोग येतात. तर फुलकिडे, कांद्यावरील माशी या किडींचा प्रादुर्भाव होतो.

काढणी : लागवडीनंतर ३ ते ४ महिन्यांनी कांदा काढणीस तयार होतो. पक्क कांद्याची पाने पिवळसर होतात. याच वेळेस कांद्याच्या वरच्या पातीचा भाग मऊ होऊन आपोआप वाळतो. पात कोलमडते. यालाच आपण 'मान पडणे' असे म्हणतो. शेतात कांदा वाळविताना एकच ढीग करण्याऐवजी पहिला कांदा दुसऱ्या कांद्याच्या पातीने झाकून जाईल, अशा पद्धतीने पसरवून पाच ते सात दिवस वाळवावा. त्यानंतर मानेला पीळ देवून ४ सें.मी. पर्यंत मान ठेवून कांद्याची पात कापावी. असे कांदे सावलीमध्ये तीन आठवडे पातळ थर देवून वाळवावे. वाळलेल्या कांद्याची प्रतवारी करून फक्त मध्यम आकाराच्या कांद्याची साठवणूक करावी. कांदे साठवणुकीसाठी कांद्याची चाळ असेल तर हवेशीर जागेत साठवावी.रोपवाटिका तयार करणे : नोव्हेंबर - डिसेंबर महिन्यात बी पेरून रब्बी हंगामासाठी रोपवाटिका करावी. एक हेक्टर पुनर्लागवडीसाठी आवश्यक असलेली रोपांसाठी ८ ते १० किलो बियाणांची व १० ते १२ गुंठ्यावरील रोपवाटिका पुरेशी होते. सामान्यतः रोपे सपाट वाफ्यात तयार केली जाते. मातीचे सौर निर्जंतुकीकरण करून घ्यावे. मात्र रोपे १ मीटर रुंद व तीन ते चार मीटर लांब, किमान १५ सेंमी उंचीच्या गादीवाफ्यावर तयार करणे चांगले. गादीवाफे नेहमी उताराला आडवे करावेत. वाफ्यात रुंदीशी समांतर चार बोटे अंतरावर रेघा आखाव्यात. त्यात बी पेरून मातीने झाकून घ्यावे. बी पेरल्यानंतर शक्यतो पहिले पाणी झारीने द्यावे. बी उगवण झाल्यावर ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी घ्यावे. रब्बी हंगामात रोपे ५० ते ५५ दिवसांत तयार होतात. रोपे काढणीपूर्वी १ ते २ दिवस अगोदर वाफ्याला पुरेसे पाणी द्यावे.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८२४ : तत्कालीन रशिया मध्ये आलेल्या भीषण पुरात जवळपास दहा हजार लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.
१९४६ : अफगणिस्तान, आइसलँड आणि स्वीडनचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९५२ : स्पेन या देशाला युनेस्को या आंतरराष्ट्रीय संस्थेचे सदस्यत्व देण्यात आले होते.
१९६० : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना
१९६९ : फूटबॉलपटू पेलेने आपला १,००० वा गोल केला.
१९६९ : 'अपोलो-१२' या अमेरिकन अंतराळयानातुन चार्ल्स कॉनराड आणि ॲलन बिल हे चंद्रावर उतरले.
१९८२ : आजच्याच दिवशी नवव्या आशियाई खेळांची भारतात दिल्ली येथे सुरुवात झाली होती.
१९८६ : पर्यावरण संबधी सुरक्षा कायदा आजच्याच दिवशी लागू करण्यात आला होता.
१९९४ : ऐश्वर्या रॉयला आजच्याच दिवशी जागतिक सुंदरी म्हणून निवडण्यात आले होते.
१९९५ : कर्नम्मा मल्लेश्वरी ने आजच्याच दिवशी भारोत्त लन स्पर्धेत विश्वकिर्तीमान स्थापित केला होता.
१९९७ : आजच्याच दिवशी कल्पना चावला अंतराळात जाणारी पहिली भारतीय महिला बनली होती.
१९९८ : व्हिन्सेंट व्हॅन गॉगचे 'द पोर्ट्रेट ऑफ ॲन आर्टिस्ट विदाऊट अ बेअर्ड' हे चित्र ७.१५ कोटी डॉलर्सना विकले गेले.
१९९८ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्यावर महाभियोग चालू. डॉ. एम. एस. स्वामीनाथनडॉ. एम. एस. स्वामीनाथन
१९९९ : शांतता, निशस्त्रीकरण आणि विकास यासाठी दिला जाणारा 'इंदिरा गांधी पुरस्कार' राष्ट्रपती डॉ. के. आर. नारायणन यांच्या हस्ते ढाक्क्याचे डॉ. मोहम्मद युनूस यांना देण्यात आला.
२००० : शांतता, निशस्त्रीकरण आणि विकास यासाठी दिला जाणारा 'इंदिरा गांधी पुरस्कार' राष्ट्रपती डॉ. के. आर. नारायणन यांच्या हस्ते कृषीशास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना प्रदान
२००६ : आजच्याच दिवशी भारताने ऑस्ट्रेलिया या देशाला परमाणु उर्जा व युरेनियम पुरवण्या संबधी समर्थन मागितले होते.
२०१३ : राष्ट्रीय एकत्मता दिन.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : मणिकर्णिका तांबे ऊर्फ 'राणी लक्ष्मीबाई' - झाशीची राणी (मृत्यू: १८५८)
१८३१ : जेम्स गारफील्ड - अमेरिकेचे २० वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १९ सप्टेंबर १८८१)
१८३८ : केशव चंद्र सेन - ब्राम्हो समाजातील एक थोर पुरूष, समाजसुधारक आणि लोकसेवक (मृत्यू: ८ जानेवारी १८८४)
१८७५ : देवदत्त रामकृष्ण भांडारकर - प्राचीन भारतीय इतिहासाचे व संस्कतीचे अभ्यासक आणि पुरातत्त्वज्ञ (मृत्यू: १३ मे १९५०)
१८८८ : जोस रॉल कॅपाब्लांका - क्यूबाचा बुद्धीबळपटू (मृत्यू: ८ मार्च १९४२)
१८९७ : स. आ. जोगळेकर - चतुरस्त्र साहित्यिक
१९०९ : पीटर ड्रकर - ऑस्ट्रियन अमेरिकन व्यवस्थापन तज्ञ, लेखक (मृत्यू: २००५)
१९१४ : एकनाथजी रामकृष्ण रानडे - क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक व कन्याकुमारी येथील विवेकानंद स्मारकाचे शिल्पकार. अधिकाधिक लोकांचा सहभाग असावा म्हणून मोठमोठ्या देणग्या जमा न करता एक एक रुपया जमा करुन त्यांनी विवेकानंद शिला स्मारकाचे प्रचंड काम उभे केले आहे. (मृत्यू: २२ ऑगस्ट १९८२)
१९१७ : इंदिरा गांधी - भारताच्या ३ ऱ्या पंतप्रधान (मृत्यू: ३१आक्टोबर १९८४)
१९२२ : सलील चौधरी - हिंदी व बंगाली चित्रपटसृष्टीतील संगीतकार (मृत्यू: ५ सप्टेंबर १९९५ मुंबई)
१९२३ : हिंदी चित्रपट सृष्टीचे प्रसिध्द संगीतकार सलील चौधरी यांचा जन्म.
१९२४ : हिंदी व भोजपुरी भाषेचे प्रसिध्द साहित्यकार विवेकी राय यांचा जन्म.
१९२८ : दारा सिंग - मुष्टीयोद्धा आणि अभिनेता (मृत्यू: १२ जुलै २०१२)
१९५१ : झीनत अमान - अभिनेत्री, मिस एशिया-पॅसिफिक-१९७०
१९७५ : सुश्मिता सेन - अभिनेत्री व मॉडेल, मिस युनिव्हर्स-१९९४.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : सर कार्ल विल्हेम सिमेन्स - जर्मन/ब्रिटिश विद्युत अभियंता, अभियांत्रिकी क्षेत्रात काम करणारी 'सिमेन्स' ही बलाढ्य कंपनी त्याच्याच भावाने स्थापन केली आहे. (जन्म: ४ एप्रिल १८२३)
१९७१ : कॅप्टन गो. गं. लिमये - मराठी लघुकथेचे प्रवर्तक व विनोदी लेखक, मुंबईत आरोग्याधिकारी असताना हिवतापाला कारणीभूत होणार्या डासांवर अभ्यास करुन त्यांनी 'डास तो काय?' अशा पुस्तकांची मालिका लिहिली होती.
१९७६ : व्हेन्ट्री कॅथेड्रल चे रचनाकार बॅसिल स्पेन्स यांचे निधन. (जन्म: १९०७).
१९८० : प्रसिध्द उपन्यासकार वाचस्पती पाठक यांचा आजच्याच दिवशी मृत्यू.
१९९९ : रामदास कृष्ण धोंगडे - कीर्तनकार व प्रवचनकार, ज्ञानेश्वरीचे अभ्यासक.
२००८ : समाजसुधारक व सर्वोदय आश्रम या संस्थेचे संस्थापक रमेशभाई यांचे निधन झाले.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# उपोषणकर्त्यांच्या दबावात येऊन प्रशासनाने शेतकऱ्यांवर अन्याय करू नये

## विभागीय आयुक्तांना निवेदन

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील केंधळी ते हातवन येथील बायपास रस्त्यासाठी हातून येथील काही ग्रामस्थ मंठा तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसलेले आहेत. परंतु उपोषणकर्त्यांच्या दबावात येऊन प्रशासनाने अल्पभूधारक शेतकऱ्यांवर अन्याय करू नये.अशी ठाम भूमिका सामाजिक कार्यकर्त्या पायल बुलबुले यांनी घेतली असून त्यांनी विभागीय महसूल आयुक्त छत्रपती संभाजीनगर व मंठा तहसीलदार सुमन मोरे यांना याबाबत निवेदन सादर केले असून जिल्हाधिकारी जालना यांना भेटून त्यांच्याकडे देखील निवेदन सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले. मंठा तालुक्यातील पुनर्वसित हातवन येथील काही ग्रामस्थ केंदळी ते हातवन या बायपास रस्त्यासाठी सध्या मंठा तहसील उपोषणाला बसलेले आहेत. ही रस्त्याची मागणी केंधळी गावठाणालगत असलेल्या खाजगी मालकीच्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनीमधून होत असल्याने संबंधित अल्पभूधारक शेतकऱ्यांनी याला तीव्र विरोध दर्शविला आहे.

रस्त्याचा प्रस्ताव त्यांच्या शेतातून जात असल्याची चर्चा सुरू झाल्याने बाधित शेतकऱ्यांनी तहसीलदार सुमन मोरे यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या. शेतकऱ्यांचे म्हणणे असे होते की आमच्या सातबारा नुसार आमच्या जमिनीमधून जर पांदण रस्ता किंवा गावठाणचे क्षेत्र जात असेल, तर आम्ही ते देण्यास तयार आहोत. पण वास्तविक हद्द कुठून आहे, हे सर्व तपासले जावे.त्यावर तहसीलदार मोरे यांनी तातडीने प्रशासकीय कारवाई करत भूमिअभिलेख विभागाकडून मोजणी करण्याचे आदेश दिले. मोजणी अहवालात स्पष्ट झालं की संबंधित शेतजमिनीमध्ये पांदण रस्ता किंवा गावठाणचे कोणतेही क्षेत्र येत नाही.यामुळे शेतकऱ्यांच्या दाव्याला पूर्णतः पुष्टी मिळाली आहे. सध्या बाधित शेतकरी हे सर्व अल्पभूधारक असून त्यांची शेती हीच उपजीविकेचे एकमेव साधन आहे. त्यामुळे त्यांनी प्रशासनाला कळविले की जबरदस्तीने आमच्या शेतातून रस्ता काढू नये. जर प्रशासनाकडे ह्या रस्त्यासाठी दुसरा पर्यायच उरला नाही, तर आम्ही आमच्या शेतातून रस्ता देण्यास तयार आहोत, परंतु आमच्या जमिनीत रस्त्यासाठी बाधित होणाऱ्या जमिनीचा आम्हाला योग्य मोबदला देण्यात यावा. या संपूर्ण प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या पायल बुलबुले यांनी पुढाकार घेत शेतकऱ्यांच्या बाजूने आवाज उठविला. विभागीय आयुक्त आणि तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की प्रशासनाने उपोषणकर्त्यांच्या दबावाला बळी पडून शेतकऱ्यांच्या जमिनीतून जबरदस्ती रस्ता करून त्यांच्यावर अन्याय न करता मोजणी अहवालात स्पष्ट झालेल्या तथ्यांचा सन्मान करून योग्य निर्णय घ्यावा. एका बाजूला रस्ता मागणारे उपोषणकर्ते आहेत, तर दुसरीकडे आपल्या अल्पशेतीचे रक्षण करण्यासाठी शेतकरी ठामपणे उभे आहेत. तहसीलदारांनी केलेली तातडीची मोजणी प्रशासनाच्या भूमिकेला स्पष्ट दिशा देणारी ठरत आहे.आता विभागीय आयुक्तांकडून पुढील आदेश काय येतात, याकडे दोन्ही बाजूंचे लक्ष लागले आहे. प्रशासनाकडून शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास प्रशासनाविरुद्ध न्यायालयीन लढा व मोठं आंदोलन उभारण्याचा इशारा पायल बुलबुले यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे.

### उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रम यशस्वीतेसाठी
## जिल्हा प्रशासन कटिबद्ध -जिल्हाधिकारी
### हलगर्जीपणा केल्यास कारवाई होणार

जालना। प्रतिनिधी

उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रम सन २०२२-२०२७ या केंद्र शासनाच्या महत्त्वपूर्ण योजनेला जिल्ह्यात यशस्वी करण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे कटिबद्ध असून, यात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाईल. अशी सुचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केली.




केंद्र शासनाने आदेशित केल्यानूसार जिल्ह्यात उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रम सन २०२२-२०२७ या योजनेच्या अंमलबजावणीसाठी माहिती घेण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल होत्या. बैठकीच्यावेळी उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या योजनेची तथा राजीव गांधी विद्यार्थी सानुग्रह अनुदान योजनेबाबतची इत्यंभूत माहिती देण्यात आली. उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रमाबाबत तालुकानिहाय माहिती घेण्यात आली. यावेळी अंबड, परतूर व जालना शहर महापालिका व त्यांच्या अखात्यारित असलेल्या शाळांतील शिक्षकांची या योजनेस अपेक्षित प्रतिसाद दिसून आला नाही. याबाबत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी नाराजी व्यक्त केली. या योजनअंतर्गत असाक्षरांना वाचन, लेखन व संख्याज्ञानचे ज्ञान देण्यासाठी स्वयंसेवकामार्फत सन २०२५-२६ मध्ये एकुण १६९८८ असाक्षरांना साक्षर करण्याचे उद्दीष्ट देण्यात आले आहेत. त्यापैकी आतापर्यंत १३ हजार ३९९ असाक्षरांची प्रत्यक्ष नोंदणी करण्यात आलेली आहे. यावेळी शिक्षणाधिकारी लता सानप यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## जिल्ह्यात आजपासून समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन-सीईओ मिन्नू

जालना। प्रतिनिधी

ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांची गुणवत्ता व कार्यक्षमता अधिक परिणामकारक करण्यासाठी राज्य शासनाने राबविलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची जालना जिल्ह्यात व्यापक अंमलबजावणी करण्यात येत आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना प्रोत्साहन देण्यासाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून हा उपक्रम राज्यभर सुरु असून अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा निश्चित केला आहे.

जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून अभियानासाठी निवडलेल्या १६० ग्रामपंचायतींमध्ये दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी दिवसभरात विविध विकासाभिमुख आणि जनसहभागावर आधारित उपक्रम राबविण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी दिले आहेत. दिवसभरातील प्रमुख उपक्रम प्रभातफेरी सकाळी ९.०० वाजता शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागातून गावागावात प्रभातफेरी. ग्रंथालय / वाचनालय तपासणी ग्रामपंचायत स्तरावरील ग्रंथालय व वाचनालयांची पाहणी.गाव स्वच्छता अभियान ग्रामपंचायत, अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थांच्या संयुक्त सहभागातून मोठ्या प्रमाणात स्वच्छता उपक्रम. शाळा / अंगणवाडीत परसबाग उभारणी विद्यार्थ्यांमध्ये पोषण जाणीव आणि पर्यावरणाभिमुखता वाढविण्यासाठी परसबागेची उभारणी.ॲनिमिया तपासणी



शिबीरतालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या मदतीने तपासणी. आयुष्मान भारत कार्ड जनजागृती ग्रामस्थांना पात्रता, लाभ आणि नोंदणीविषयी मार्गदर्शन.मशाल फेरी ग्रामस्थ, अधिकारी व सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांच्या सहभागातून प्रेरणादायी मशाल फेरी. सदरील उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, तालुका आरोग्य अधिकारी आदींना जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. अभियानातील प्रत्येक उपक्रम गावागावात काटेकोरपणे पार पाडण्याचे स्पष्ट निर्देश सीईओ मिन्नू पी. एम. यांनी दिले आहेत.

## जालन्यात ४८ रिक्षा विरूध्द ई चलनद्वारे तीन लाखाची दंडात्मक कार्यवाही

जालना । प्रतिनिधी

जालना शहरामध्ये आज १८ नोव्हेंबर रोजी जालना शहरात विविध ठिकाणी आरटीओ, शहर वाहतुक शाखा जिल्हा वाहतूक कदीम जालना सदरबाजार जालना यांचे वतीने अधिकारी व अंमलदार यांनी शहरामध्ये विनापरमिट प्रवासी नेणा-या रिक्षांवर विना नंबर व इतर जिल्हा पासींग या रिक्षावर मोटार वाहन कायदयान्वये कारवाई करणे करीता विशेष मोहीम राबवली असता एकूण ४८ रिक्षाची तपासणी केली.

त्यांचेवर ई चलन व्दारे चलन केली असुन एकुण दंड ३,१५,७५०/- एवढा आकरण्यात आलेला आहे. तसेच यापुढेहि सदरची कार्यवाही विशेष मोहीम राबवून कार्यवाही करण्यात येणार आहे.

सदरील कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री अजयकुमार बन्सल , मा. अपर पोलीस अधिक्षक श्री आयूष नोपाणी , मा.



उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कूलकर्णी ,आरटीओ कार्यालयाचे चंदमोहन चिंतल यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शहर वाहतूक शाखा पी व्ही इंगळे, व आरटीओ विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखा, पोलीस ठाणे कदीम जालना, सदरबाजार, जिल्हा वाहतूक शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी विशेष मोहीम मध्ये भाग घेवून रिक्षावरती कार्यवाही केली आहे.

## रंगनाथ महाराजांची १९० वा पुण्यतिथी सोहळा

### महाराजांच्या नामस्मरणाने सोहळ्याला दिव्य पावित्र्य लाभले – भास्कर दानवे

जालना। प्रतिनिधी

नाव्हा (ता. जालना) (ता.१७) येथे आनंदी आत्मानंद सरस्वती उर्फ रंगनाथ महाराजांच्या ११० व्या पुण्यतिथी सोहळा मोठ्या उत्साहाने संपन्न झाला, यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी महाराजांच्या पवित्र मूर्तीचे दर्शन घेतले तसेच संस्थान तर्फे यावर्षी प्रथमच दिंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडी स्पर्धेत पंचक्रोशीतील २१ गावांतील भक्तांनी हरिनामाच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या नादात मोठ्या उत्साहाने दिंडीत सहभाग नोंदवला.

दिंडी स्पर्धेत धारकल्याण दिंडीला प्रथम, नाव्हा दिंडीला द्वितीय व मौजे आनंदवाडी भजनी



मंडळास तृतीय क्रमांक घोषित करण्यात आला. भास्कर आबा दानवे म्हणाले की, ''रंगनाथ महाराजांच्या कृपेने नाव्हा परिसरात भक्तिभाव, हरिनाम आणि सामाजिक एकोपा अधिक दृढ होत आहे. दिंडी परंपरा ही आपली सांस्कृतिक ओळख असून अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीत संस्कार, शिस्त आणि भक्तीची भावना जागृत होते. संस्थानतर्फे केलेले आयोजन अत्यंत अनुकरणीय असून पुढील वर्षी दिंडी स्पर्धेला आणखी भव्य स्वरूप देण्यासाठी आपला सर्वतोपरी सहकार्य राहील तसेच पुढील वर्षीच्या दिंडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या दिंडीस माझ्यावतीने रुपये ५१,०००/- रोख देण्यात येणार असल्याची घोषणा भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केली. यवेळी कार्यक्रमास पंचक्रोशीतील असंख्य भाविक मोठ्या श्रद्धेने उपस्थित होते.

## वसमतमध्ये मोठा उलटफेर : शिंदे सेनेचे डॉ. क्यातमवार भाजपमध्ये

हिंगोली। प्रतिनिधी

येथे दोन महिन्यांपूर्वीच काँग्रेसला रामराम ठोकत शिंदेसेनेत दाखल झालेल्या डॉ. मारोती क्यातमवार यांनी सोमवारी अचानक भाजपामध्ये उडी घेतली. भाजपामध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांनी वसमतच्या नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी देखील दाखल केली. त्यांच्या या हनुमान उड्या नागरिकांसाठी चर्चेचा विषय बनल्या आहेत.

येथील वैद्यकीय व्यावसायिक डॉ. मारोती क्यातमवार हे खासदार राजीव सातव यांचे निकटवर्तीय मानले जात होते. खासदार सातवांमुळेच ते काँग्रेसमध्ये रमले होते. मात्र खासदार सातवांच्या निधनानंतर त्यांचे काँग्रेसमध्ये मन रमलेच नाही. पक्षाच्या नेत्यांनी त्यांना मदतही केली नाही. त्यामुळे नाराज होत त्यांनी काँग्रेसला रामराम ठोकून मुंबई येथे शिंदेसेनेत प्रवेश केला. दरम्यान, डॉ. क्यातमवार यांच्या शिंदेसेनेच्या प्रवेशामुळे वसमत तालुक्यात पक्षाला बळ मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. तर पालिका निवडणुकीत त्यांच्या पक्ष प्रवेशाचा फायदा होईल असे बोलले जात होते. मात्र वसमत पालिकेमध्ये राष्ट्रवादी (अजित पवारगट) व शिंदेसेनेची युती झाली आहे. त्यातच नगराध्यक्षपद राष्ट्रवादीला देण्यात आले. या संदर्भात आमदार राजेश नवघरे व आमदार संतोष बांगर यांच्यात चर्चाही झाली असून नगरसेवक पदाचे जागा वाटपही झाले. दरम्यान, शिंदेसेनेने नगराध्यक्षपद राष्ट्रवादीकडे दिल्यामुळे डॉ. क्यातमवार पुन्हा एकदा नाराज झाले. त्यामुळे त्यांनी शिंदेसेनेला जय महाराष्ट्र करीत भाजपामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यांनी भाजपात प्रवेश करून जय श्रीरामचा नारा देत भाजपाकडून नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्जही दाखल केला आहे. त्यांच्या हनुमान उड्यांमुळे वसमतच्या राजकीय वर्तुळातून चांगलीच चर्चा रंगू लागली आहे. या संदर्भात डॉ. क्यातमवार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्याचे स्पष्ट केले.

## बार फोडणारे, वाहन चोरणाऱ्या दोघांना बेड्या

लातूर। प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील वाहन चोरी व बियर बार फोड प्रकरणे उघडकीस आणण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास यश आले असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ४६ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

गेल्या काही महिन्यांमध्ये लातूर जिल्ह्यात बियर बार, देशी दारू दुकाने फोडून दारू व चारचाकी-दुचाकी वाहने चोरीच्या घटना वाढल्या होत्या. विविध पोलीस ठाण्यांमध्ये नोंद झालेल्या या गुन्ह्यांचा सखोल तपास करून आरोपींचा शोध लावण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी विशेष सूचना देऊन तपासगती वाढवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात विशेष पथक तयार करण्यात आले होते. १७ नोव्हेंबर रोजी पथकाला बोरोळ येथील एका शेतात दोन ट्रॅक्टर व मोटारसायकलींसह दोन इसम संशयास्पदरीत्या थांबले आहेत .

अशी गुप्त माहिती मिळाली होती त्या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचून प्रदीप विष्णु यशवंते (वय २६, रा. देवळा, जि. बीड) आणि शाम ओमकार जमादार (वय २५, रा. मोरंबी, ता. भालकी, जि. बिदर, कर्नाटक) या दोघांना ताब्यात घेतले. पंचनामा करताना दोघांकडून ५, लाख २० हजार रोख, दोन ट्रॅक्टर आणि दोन मोटारसायकली मिळून आल्या होत्या. चौकशीत त्यांनी त्यांच्या तिसरा साथीदार प्रदीप उर्फ लालु माधव कांबळे, (वय २४ वर्षे रा. बसपुर ता. निलंगा) असे मिळून लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून ५ ट्रॅक्टर, १ पिकअप, २ स्कॉर्पिओ, २ मोटारसायकली चोरी केल्याची तसेच चार बियर बार, देशी दारू दुकाने व बियर शॉप फोडून दारूची चोरी केल्याची कबुली दिली. तसेच एका शेतातील सोयाबीनची चोरीकेल्याचेही आरोपींनी सांगितले.

तपासात आरोपींविरोधात लातूर ग्रामीण, रेणापुर, गातेगाव, किल्लारी, उदगीर ग्रामीण, मुरुड, एमआयडीसी, भादा, देवणी तसेच आनंदनगर (धाराशिव) पोलीस ठाण्यांतील एकूण १५ गुन्ह्यांमध्ये त्यांचा सहभाग असल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईत ४६ लाख ४५,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई एसपी अमोल तांबे व एएसपी मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.


# तांदुळवाडी शिवारात मध्यरात्री दरोडा,पाच जण गंभीर जखमी

संभाजीनगर। प्रतिनिधी

गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तांदुळवाडी शिवारात मुखवटेधारी चोरट्यांनी घरात घुसून थरकाप उडवणारा दरोडा टाकल्याची धक्कादायक घटना घडली. चोरट्यांनी घरातील वृद्ध महिलांसह कुटुंबातील सर्व सदस्यांना बेदम मारहाण करत चार ते पाच लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि चार हजार रुपये रोख रक्कम लुटून पलायन केले. चोरट्यांच्या मारहाणीत पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.

जनार्दन कारभारी राशिनकर (७०), पोपट जनार्दन राशिनकर (३५), मनीषा पोपट राशिनकर (२७), हिराबाई जनार्दन राशिनकर (५०) अशी जखमींची नावे आहेत. राशिनकर कुटुंब साखर झोपेत असताना ७ ते ८ मुखवटेधारी चोरट्यांनी घरात घुसून चोरी करण्याचा प्रयत्न केला. कुटुंबातील सदस्यांना याची कुणकुण लागली त्यांचा त्यांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता. चोरट्यांनी त्यांच्यावर कुऱ्हाड आणि काठीने जोरदार हल्ला करत गंभीर जखमी केले. घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन पसार झाले. रात्री दोन ते तीन वाजता राशिनकर यांच्या घराकडून आक्रोशाचा आवाज येत असल्याचे उपसरपंच दत्तू राशिनकर यांच्या पुतण्याला विनायक नानासाहेब राशिनकर यांना ऐकू आले. त्यांनी तत्काळ दत्तू राशिनकर, मोहन राशिनकर आणि बाबासाहेब राशिनकर यांना बोलावले.

त्यानंतर दत्तू राशिनकर मोटारसायकल सुरू करून विनायक आणि तुषार राशिनकर यांच्यासह घटनास्थळी गेले असता कुटुंबातील सदस्य गंभीर जखमी




अवस्थेत दिसले. चोरट्यांनी घरातील एका महिलेला कुऱ्हाडीने मारहाण केली, तर इतरांवर लाकडी दांड्यांनी प्राणांतिक हल्ला केला. जवळपास दीड ते दोन तास चोरट्यांनी घरातच थैमान घालत लूटमार केली. सर्व जखमींना सिद्धनाथ वाडगाव उपकेंद्रात नेण्यात आले. मात्र, तिथे उपचार न मिळाल्याने त्यांना गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर सर्व जखमींना छत्रपती संभाजीनगर घाटी रुग्णालयात सकाळी साडेआठ वाजता रवाना करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच शिल्लेगाव पोलिस पहाटे घटनास्थळी दाखल झाले व पाहणी केली. परंतु या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस करत आहे. ही घटना दरोडा की काही वैयक्तिक वादाचा परिणाम, याबाबत ग्रामीण भागात विविध चर्चांना उधाण आले आहे. एका कुटुंबावर धाडसी हल्ल्यानंतर परिसरात दहशतीचे वातावरण; पोलिसांकडून तत्काळ कारवाईची मागणी केली. या धाडसी हल्ल्यानंतर तांदुळवाडी परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण आहे. चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे.

## अजिंठा घाटात २० तासांहून अधिक काळ वाहतूक कोंडी

संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगरड्डजळगाव राष्ट्रीय महामार्गावरील फर्दापूर येथील अजिंठा घाटात रविवारी रात्री झालेल्या वाहनबिघाडांच्या मालिकेमुळे तब्बल २० तासांहून अधिक काळ वाहतूक कोंडी झाली. अरुंद आणि वळणदार घाटरस्त्यावर तीन ठिकाणी ट्रक बिघाडल्याने घाटात रात्री ८.१५ वाजल्यापासून सोमवारी दुपारी ४ वाजेपर्यंत वाहनांच्या प्रचंड रांगा लागल्या. त्यामुळे पर्यटक, प्रवासी, विद्यार्थी आणि रुग्णांना कडाक्याच्या थंडीत संपूर्ण रात्र महामार्गावरच व्यतीत करावी लागली.

भुसावळकडून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने औष्णिक वीज केंद्राची राख घेऊन जाणारा ट्रेलर (क्र. एमएच २१ बीएच ५८६८) अजिंठा घाटातील अरुंद मार्गावर रविवारी रात्री ८:१५ वाजेच्या सुमारास अचानक बंद पडला. त्यामुळे घाटातील महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या, वाहतूक कोंडीत अडलेल्या वाहनांची मार्ग काढण्याची धडपड सुरू असतानाच अजून दोन ट्रक घाटातील वळणदार मार्गावर बंद पडले. त्यामुळे घाटात प्रचंड वाहतूक कोंडी होऊन



फर्दापूर बसस्थानकापासून घाटापर्यंत तब्बल तीन किलोमीटरचा रस्ता वाहनांनी गच्च भरून गेला. परिणामी वाहतूक कोंडीत अडकलेल्या अनेक पर्यटक, प्रवासी व वाहनचालकांना संपूर्ण रात्र कडाक्याच्या थंडीत कुडकुडतच महामार्गावर व्यतीत करावी लागल्याचे दिसून आले. वाहतूक कोंडी होऊन तब्बल २० तासांहून अधिक काळ उलटला तरीही सोमवारी (दि. १७) दुपारी ४ वाजेपर्यंत घाटातील परिस्थिती कायम असल्याचे दिसून आले आहे. असलेली वाहतूक आणि अरुंद रस्त्यामुळे होत असलेल्या वाहन बिघाडांमुळे वारंवार कोंडीची समस्या निर्माण होत असून कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज आहे.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा दोन गुंडांना दणका

## दोघांची एमपीडीए कायद्याअंतर्गत हर्सूल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन व कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्यानुसार माजलगाव तालुक्यातील एक व गेवराई तालुक्यातील एकावर कायद्या अंतर्गत कारवाई करून त्यांना हर्सूल जेलमध्ये पाठवण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन प्रभारी अधिकारी १. पो.नि. पो.स्टे. माजलगांव शहर यांनी दि. २१.१०.२०२५ रोजी इसम नामे शाम आप्पाराव भालेकर वय ३८ वर्षे रा. अशोक नगर माजलगांव व सपोनि चकलंबा यांनी दिनांक १०.११.२०२५ रोजी २) इसम नामे गोपाल मधुकर उनवणे वय २४ वर्षे रा. चकलंबा ता. गेवराई जि. यांचे विरुध्द कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.





सदर स्थानबध्द इसम क्रमांक १ याचे विरुध्द पो.स्टे. माजलगांव शहर येथे कल्याण व मिलन मटका खेळणे व खेळवीणे १ रुपयाचे ९० रुपये देण्याचे अमिष दाखवुन बेकायदेशीर रित्या मटका जुगार चालविणे व धमक्या देणे शिवीगाळ करणे अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०५ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचेवर कलम १२९ बीएनएसएस अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती तरी त्याचे वर्तणात सुधारना झाली नाही.

सदर स्थानबध्द इसम क्रमांक २ याचे विरुध्द पो.स्टे. चकलंबा, गेवराई व शिवाजीनगर येथे खुनाचा प्रयत्न करणे, गैरकायदयाची मंडळी जमविणे, दंगा करणे, गंभीर दुखापत करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करणे, खंडणीची मागणी करणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०४ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यातील ०२ गुन्हे न्यायप्रविष्ठ व ०२ गुन्हे तपासावर आहेत. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचेवर कलम १२९ बीएनएसएस अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती तरी त्याचे वर्तणात सुधारना झाली नाही.

सदर प्रकरणात विवेक जॉन्सन जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक १७.११.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर दोन्ही इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्मुल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना संबधित पो. स्टे. प्रभारी अधिकारी व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा शिवाजी बंटेवाड व पो.नि. राहुल सर्युतह पो. स्टे. माजलगांव शहर यांनी संयुक्त रित्या ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत गोपणीय माहीतीच्या आधारे सदर इसमांना अनु क्रमे दि. १७.११.२०२५ व १८.११.२०२५ रोजी ताब्यात घेऊन नमूद इसमांना हार्सल कारगृह, छत्रपती संभाजीनगर येथे दि. १८.११.२०२५ रोजी हजर करुन स्थानबध्द केले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक ◀◀ पान ३ वर

# कासारी येथे सद्गुरु बाबा यात्रेनिमित्त रंगला जंगी कुस्त्यांचा सामना; गावकऱ्यांच्या वतीने भव्य दंगलीचे आयोजन

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील कासारी येथे प्रतिवर्षी प्रमाणे सदगुरु बाबांची यात्रा याही वर्षी धार्मिक वातावरणात भरवण्यात आली. जागृत देवस्थान म्हणून प्रख्यात असलेल्या सदगुरु बाबांच्या दर्शनासाठी शनिवार ते सोमवार या तीन दिवसांच्या यात्रेत हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांनी हजेरी लावत दर्शन घेतले.



सोमवारी कुस्त्यांच्या भव्य दंगली चे आयोजन समस्त गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी येथील डोंगराच्या पायथ्याशी कुस्त्यांचा जंगी सामना रंगला. रविवारी सकाळी गाड्या ओढण्याचा कार्यक्रम तर सायंकाळी सद्गुरु बाबांच्या पादुका असलेली पालखी मंदिर ते कासारी गाव अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. तत्पुर्वी महाप्रसादाचे आयोजन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. गावात व परिसरात सर्वत्र भक्तीमय व प्रसन्न वातावरण होते. अबालांसह नवतरुण पहेलवानांची महाराष्ट्र केसरी शिवाजी केकान,माजी जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब तिडके,पहेलवान रामेश्वर मुंडे, युवराज ठोंबरे, बळीराम डापकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कुस्त्यांची दंगल रंगली. दहा रुपयांपासून ५ हजार रुपयांची बक्षिसे दंगलीत जिंकलेल्या मल्लांना जाहीर करण्यात आली. सायंकाळी ◀◀ पान ३ वर

# वन विभागाने बिबटे पकडून जेल बंद करावेत -घोडके

## हल्यात मनुष्य मेला तर एक कोटी भरपाई द्यावी अशी निवेदन देऊन केली मागणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात बिबट्याची मोठी दहशत झाली असून, मानवी जिवन सध्या बिबट्याच्या दहशतीखाली असून कित्येक ठिकाणी मनुष्यावर बिबट्याचा हल्ला होता असताना आपण फक्त पाहण्याची भूमिका येत आहेत. हा तुमचा वन्य प्राणी तुम्ही सांभाळा, तुमचा प्राणीच आमच्या भागात येऊन आमच्या शेतात वस्तीत गावात येऊन जर तो माणसावर हल्ला करित असेल, आणि आपण वन अधिकारी म्हणून जर पाहण्याची भूमिका घेत



असाल तर आपण या गोष्टीत गुन्हेगार आहात, कारण तुमच्या जंगलात आम्ही गेलो तर गुन्हेगार तुमच्या वन्य प्राणांवर काही इजा झाली तर आम्ही गुन्हेगार हा तुमचा कायदा सांगतो व आपण तशी कारवाई करीत आहात, तर तुमचा बिबट्या आमच्या शेतात आमच्या वस्तीत आमचा वर हल्ला करून आम्हाला मारीत असेल तर सदर मनुष्यवधाचा गुन्हा २९९ नुसार आपण गुन्हेगार आहात.

तुमच्या बिबट्यापासून जर आम्हाला गंभीर जखम झाली तर कळम ३०७ नुसार आपण गुन्हेगार आहात याची आपण नोंद व्यावी मृत व्यक्तीला एक कोटीची आर्थिक मदत व जखमी व्यक्तीला २५ लाखांची आर्थिक मदत आपण चावी, हे मान्य नसेल तर तुमचा वन्यप्राणी तुमच्या वनीकरण मध्ये थांबवा, अन्य हे वन्यप्राणी आष्टी तालुक्यातून ◀◀ पान ३ वर

# अतिवृष्टीने खरिपाचे नुकसान शेतकऱ्यांची आता रब्बी पिकावरच मदार

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांचा कल आता ज्वारी राजमा पिकाकडे असून राज्याच्या ठिकाणीही जोर धरला आहे शेतकरी आता रब्बी हंगामावरील कामावर अवलंबून आहे दृष्टीने हातात तोंडाशी आलेला घास गेला आता या पिकावरच मदर आहे रब्बी हंगामासाठी पाटोदा तालुक्यात ८० हजार दोनशे पाच हेक्टर पैकी ६७ हजार ४८३ हेक्टर एवढे क्षेत्र पेरणी योग्य आहे पाटोदा तालुक्यात अठरा हजार हेक्टर ज्वारी पेरणी केली आहे त्या पाठोपाठ ८४१ हेक्टर हरभरा १५ ४५ हेक्टर कडधान्य पेरणी करण्यात आली आहे शेतकऱ्यांचा ज्वारी पिकाकडे सगळ्यात जास्त कल दिसत आहे अठरा हजार हेक्टर ज्वारीची पेरणी करण्यात आली आहे यावर्षीचा ज्वारीचा आकडा विक्रमी मानला जात आहे ज्वारी सोबत राजमा पिकलेली मोठ्या प्रमाणात घेण्यात आले आहे त्याला भाऊ पण चांगला आहे उतार पण चांगला आहे थंडीचा हवामान पण व्यवस्थित आहे भगत पेरणी वेळेत झाल्यामुळे पिके पण जोमदार आली आहेत अजूनही पेरण्या सुरू आहेत यंदाचा रब्बी हंगाम शेतकऱ्यांसाठी उत्तम आहे तालुक्यात व परिसरात वेळेत पेरण्या झाल्यामुळे पिके जोमदार आले आहेत

# काँग्रेसकडून कोकिळा लक्ष्मण पवळ मैदानात

बीड । प्रतिनिधी

वार्ड क्रमांक एक मधून सौ कोकिळा लक्ष्मण दादा पवळ यांचा काल दिनांक १७ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.



उमेदवारी दाखल करत असताना सोबत परवेज भाई कुरेशी, दादासाहेब बजगुडे तालुका अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष सोनवणे यांच्या समवेत उमेदवारी अर्ज दाखल केला.ही उमेदवारी अशोक पाटील व माजी खासदार रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दिली आहे.कोकिळा पवळ ह्या राजीव गांधी पंचायत संघटनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण दादा पवळ यांच्या पत्नी आहेत.दादांचे आज पर्यंत चे सामाजिक कार्य लक्षात घेऊन वार्ड क्रमांक एक च्या जनतेने त्यांना उमेदवारी देण्याचा आग्रह केला होता.

# शंभरचिरा ते पाटोदा बोगस रस्ता, बेजबाबदार प्रशासनच्या विरोधात अॅड.नरसिंह जाधव यांचे ५ डिसेंबरला उपोषण

पाटोदा । प्रतिनिधी

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (MRL-01, NH-561 जवळला फाटा ते पाटोदा) या ६.६१ कोटींच्या रस्त्याचे बोगस आणि अंदाजपत्रकविरोधी काम उघड झाल्यानंतरही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याने जनता संतप्त झाली असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष अॅड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी आता थेट आरपारची लढाई छेडण्याची घोषणा केली आहे.यादृष्टीने ते ५ डिसेंबर २०२५ रोजी तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय तीव्र उपोषण करणार असून प्रशासनाला हादरा बसणार, जाधव यांनी ०९ जुलै आणि ०३ सप्टेंबर २०२५ रोजी केलेल्या तक्रारीत रस्ता सबलेट पद्धतीने, निकृष्ट साहित्य वापरून, उथळ थर टाकून आणि इस्टिमेटचे उल्लंघन करून करण्यात आल्याचे ठोस पुरावे सादर केले होते. फक्त एका महिन्यात कोट्यवधींचा रस्ता उखडला, यावरून ६.५० कोटी रुपयांचा अपहार झाल्याचा त्यांचा आरोप आणखी गंभीर ठरतो. तक्रारीनंतर झचत्र्ध्ध बीडकडून पावसाळ्यानंतर नवे काम सुरू करू अशी दिलेली आश्वासने आजवर रिकामी घोषणाच ठरली आहेत.ना दुरुस्ती,ना पुनर्बांधणी, ना दोषींवर कारवाई यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात अविश्वास वाढला आहे. जाधव यांचा प्रशासनाला थेट इशारा जनतेचा सहा कोटींचा निधी पाण्यात घालणाऱ्यांवर कारवाई न झाल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करू.५ डिसेंबरचे उपोषण ही फक्त सुरुवात आहे; ◀◀ पान ३ वर

# डीवायएफआयचे १३ वे महाराष्ट्र राज्य अधिवेशन माजलगावला

## १९ नोव्हेंबरच्या रॅली व जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा – कॉ. मुसद्दीक बाबा सर

माजलगाव । प्रतिनिधी

डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय)चे १३वे महाराष्ट्र राज्य अधिवेशन माजलगाव येथे दिनांक १९ ते २१ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे. या अधिवेशनानिमित्त जुनी मार्केट कमिटी, जुना मोंढा, माजलगाव येथे १९ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला मार्गदर्शन करण्यासाठी किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, राज्य सरचिटणीस तथा शेतकरी नेते डॉ. अजित नवले, प्रसिद्ध विधिज्ञ ड. असीम सरोदे, डीवायएफआयचे राष्ट्रीय महासचिव हिमघ्नराज भट्टाचार्य, स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. मिलिंद आवाड हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. तत्पूर्वी छत्रपती संभाजी महाराज चौक येथून दुपारी १२ वाजता युवा रॅलीला सुरुवात होईल. या रॅलीला आणि जाहीर सभेला तालुक्यातील युवक, विद्यार्थी, शेतकरी व शेतमजूर बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माकप नेते कॉ. मुसद्दीक बाबा सर यांनी केले आहे.

अधिवेशनाची सुरुवात दिनांक १९ नोव्हेंबर रोजी दुपारी छत्रपती संभाजी महाराज चौकापासून मुख्य रस्त्याने काढण्यात येणाऱ्या मोठ्या रॅलीने होणार आहे. ही रॅली मार्केट कमिटी, जुना मोंढा येथे पोहोचल्यानंतर तिचे जाहीर सभेत रूपांतर होईल. डीवायएफआय ही संघटना मागील ४५ वर्षांपासून शिक्षण, रोजगाराच्या समान संधी, सामाजिक न्याय आणि समानता या मूलभूत प्रश्नांवर संघर्ष करत आहे. नवी पिढी वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून तयार करण्याचे उद्दिष्ट या युवा संघटनेचे आहे. या राज्य अधिवेशनात राज्यभरातून संघटनेचे हजारो कार्यकर्ते सहभागी होणार आहे. हे अधिवेशन यशस्वी करण्याचे आवाहन माकप नेते मुसद्दिक बाबा सर यांनी केले आहे. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी डीवायएफआयचे राज्य उपाध्यक्ष मोहन जाधव, जिल्हा अध्यक्ष सुहास झोडगे, जिल्हा सचिव विशाल देशमुख यांच्यासह जिल्हाभरातील डीवायएफआय आणि एसएफआयचे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# माजलगावात होलसेल दुकान फोडून दहा लाखाच्या सिगारेट पळवल्या, चोरीचे सत्र थांबेना

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील सूर्याचे सत्र थांबत नसून गजानन नगर रोडवर असलेल्या श्रीकृष्ण ट्रेडर्स या होलसेल दुकानाचे शटर वाकून चोरट्याने आतील दहा लाख रुपये किमतीचे सिगारेटचे आठ बॉक्स व नगदी ७५ हजार रुपये लंपास केल्याची घटना सोमवारी सकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान घडली असून याप्रकरणी अज्ञात चार चोरट्याविरुद्ध माजलगाव शहर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील गजानन रोडवर श्रीकांत श्रीनिवास रूद्रवार यांचे श्रीकृष्ण ट्रेडर्स हे होलसेल दुकान असून ते नेहमीप्रमाणे रविवारी रात्री लवकर दुकान बंद करून गेले होते. सोमवारी त्यांना सकाळी सात वाजता




शेजारील दुकानदाराने फोन करून सांगितले की तुमचे दुकान फोडले असून तुम्ही तात्काळ इकडे या यावर ते दुकान कडे गेले असता त्यांना दुकानचे शटर वाकलेले दिसले आत प्रवेश केला असता दुकानातील सिगरेटचे दहा लाख किमतीचे आठ बॉक्स व गल्ल्यातील नगदी ७५ हजार रुपये गायब असल्याचे दिसून आले. तर दुकानातील सीसीटीव्हीचा डीव्हीआर ही चोरट्याने तोडून नेल्याचे दिसले यावरून त्यांनी बाजूला असलेल्या बँकेचे सीसीटीव्ही चेक केले असता दुकान समोर सकाळी पाच वाजता स्विफ्ट गाडीत आलेल्या चार चोरट्यांनी सिगरेट बॉक्स पळवल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी तात्काळ शहर पोलीसशी संपर्क केला असता शहर पोलीस आणि घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्हीची पाहणी करत शहरात अनेक ठिकाणी या वेळेचे सीसीटीव्ही फुटेज हस्तगत केले असून याप्रकरणी दुकान मालक श्रीकांत श्रीनिवास रूद्रवार यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चार चोरट्याविरुद्ध शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

# छाननीदरम्यान नगरसेवक पदाच्या ३६ तर अध्यक्ष पदाचे ४ उमेदवारांचे अर्ज बाद

किल्लेधारूर । प्रतिनिधी

नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर होती. अध्यक्षपदासाठी १६ आणि नगरसेवक पदांच्या २० जागांसाठी एकूण१५१ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. आजपासून उमेदवारी अर्जांची छानन्नी प्रक्रिया सुरू झाली असून पहिल्याच दिवशी छाननीदरम्यान अध्यक्ष पदाचे चार व नगरसेवक पदाचे ३६ उमेदवारांचे अर्ज त्रुटी आढळल्याने बाद करण्यात आले.यामध्ये भाजपाच्या प्रभाग क्रमांक १०(ब) येथील अजय गायसमुद्रे यांच्या अर्जाचाही समावेश असल्याची माहिती निवडणूक विभागाकडून मिळाली आहे.

कागदपत्रांतील विसंगती, आवश्यक पुराव्यांची कमतरता आणि तांत्रिक चुका या कारणांमुळे संबंधित अर्ज अपात्र ठरवण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.अध्यक्ष पदासाठी १६ अर्ज आले होते यातील ४ अर्ज बाद ठरले असून १२ अर्ज पात्र ठरलेआहेत. तर २० नगरसेवकापदा साठी १५१अर्ज आले होते यातील ३६ अर्ज बाद ठरले असून ११५ अर्ज पात्र ठरले आहेत.छानन्नी प्रक्रियेनंतर अपात्र ठरलेल्या उमेदवारांना दाद मागण्यासाठी निर्धारित कालावधीत अपील करण्याची संधी उपलब्ध आहे. दरम्यान अर्ज बाद झाल्यानंतर काही प्रभागांत राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता चर्चेत आली आहे. निवडणूक प्रक्रियेने आता वेग पकडला असून शहरातील वातावरण अधिकच तापले आहे.

# अंबाजोगाईत नगराध्यक्ष पदासाठी दोन अनुभवी दिग्गजांमध्ये लढत

## राजकिशोर मोदी व नंदकिशोर मुंदडा आमने–सामने

**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई नगरपालिका निवडणुकीसाठी गेल्या पंचवीस वर्षापासून राजकारणात मजबूत पकड असलेले दोन नेते आमने–सामने आले आहेत. गेल्या पंचवीस वर्षापासून अंबाजोगाई नगरपालिकेवर मजबूत पकड ठेवणारे आणि अनेक वर्ष अंबाजोगाईचे नगराध्यक्ष राहिलेले राजकिशोर उर्फ पापा मोदी यांच्या विरोधात गेल्या पंचवीस वर्षापासून आमदारकिचे राजकारण करणारे स्वर्गीय विमल मुंदडा यांचे पती नंदकिशोर मुंदडा हे नगराध्यक्ष पदासाठी आमने–सामने असून या दोन दिग्गजांमध्ये चुरशिची लढत होणार असल्याचे चिन्ह दिसत आहे.

अंबाजोगाई शहर हे सुशिक्षितांचे शहर मानले जाते. या शहरांमध्ये गेल्या पंचवीस वर्षापासून नगरपालिकेमध्ये राजकिशोर मोदी यांचा हुकमी एक्का चालतो.



अंबाजोगाईतील अनेक दिग्गज त्यांना नगरपालिकेमध्ये साथ देतात. राजकिशोर मोदी हे काँग्रेस मधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आले तर भाजपाच्या आमदार स्वर्गीय विमल मुंदडा यांचे सक्रिय राजकारण करणारे त्यांचे पती नंदकिशोर मुंदडा उर्फ नंदुकाका हे प्रथमच प्रत्यक्ष मैदानात उतरून नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवत आहेत. सुरुवातीच्या काळामध्ये दोघांनीही चांगले काम केले. मात्र काळ निघून गेला तसतसे त्यांच्या कामाची गतीही कमी झाली. राजकिशोर मोदी यांनी शहरात अनेक विकास कामे केली. मात्र नंतर त्यांच्या कामाची गती हळूहळू कमी झाली. गेल्या काही दिवसापासून त्यांच्या कामाचा



उरक कमी झाल्याने शहरातील अनेकांची त्यांच्याबद्दल नाराजी आहे. तर अनेकांनी नवीन लोकांना संधी मिळावी अशा भावना व्यक्त केल्या. विशेष म्हणजे हे दोघेही आपापल्या पक्षाचे उमेदवार नसून ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा हे अंबाजोगाई शहर परिवर्तन जनविकास आघाडीच्या वतीने निवडणूक लढवत आहेत तर राजकिशोर मोदी हे लोकविकास महाआघाडीच्या वतीने निवडणूक लढवत आहेत. स्वतःच्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक न लढवता स्वतंत्र आघाड्या करून हे दोघे निवडणूक लढवत आहेत. पक्षाकडून निवडणूक लढवली तर आपला पराभव होईल काय अशी भीती कदाचित यांना वाटत असावी. त्यामुळे सर्वांच्या मदतीने आघाडी करून हे दोघेही निवडणूक लढवत आहेत. या ठिकाणी सुशिक्षित मतदार जास्त आहे. त्यातही अनेक दिग्गज राजकारणाबरोबर समाजकारण करत आहेत. त्यामुळे इतरही लोक या पदासाठी पात्र ठरत असतानाही इतरांना संधी न देता आपणच या पदावर असले पाहिजे आपली राजकारणावर पकड राहिली पाहिजे असा हेतू ठेवून हे दोघे निवडणूक रिंगणात आहेत. या दोघांमुळे इतर तरुण कार्यकर्त्यांना संधी मिळत नाही. अशी भावना शहरातील नागरिक व्यक्त करीत आहेत. पूर्वीचा जो कामाचा वेग होता तो आता दोघांच्याही बाबतीत मंदावला ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# निवडणुकीच्या तोंडावर बारामतीत खळबळ!
## अजित पवारांच्या घराबाहेर अघोरी पूजेचा प्रकार

**बारामती । प्रतिनिधी**

एकीकडे बारामती नगरपरिषदेची धामधूम सुरु असताना बारामतीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहयोग सोसायटी या निवासस्थानासमोर अघोरी पूजा, भानामतीचा प्रकार केल्याचे उघडकीस आले. यामुळे बारामतीत खळबळ उडाली असून अंधश्रद्धा निर्मुलन समितीने अशा खुळचट प्रकाराबाबत नाराजी व्यक्त केली आहे.




सहयोग सोसायटी उच्चभ्रू समजली जाते. तेथे २४ तास सुरक्षारक्षक, पोलिसांचाही बंदोबस्त असतो. या परिसरात सीसीटीव्ही सुरक्षेसाठी लावण्यात आलेले आहेत. तरीही सोसायटी बाहेरील पदपथावर ही अघोरी पूजा कोणी आणि कधी केली असेल याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. निवडणूकीत तिकिट मिळावे या भावनेतून हा प्रकार केला गेला असावा, अशी एक शक्यता पुढे येत आहे. सोसायटीच्या मुख्य गेटजवळ जमिनीवर लिंबू, मिरची, काळे कापड, डाळी, काळ्या रंगाची काढलेली चांदणी, हळद-कुंकू, नारळ, गारगोटीचे दगड वापरून पूजा केली आहे. तसेच लिंबाचा उतारा सुद्धा येथे आढळून आला. हा प्रकार सकाळी सहयोग सोसायटीतील रहिवाशांना दिसला. त्यानंतर लगेचच परिसरात एकच खळबळ उडाली. निवडणुकीच्या तोंडावर हा प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. काही लोकांचे म्हणणे आहे की, हे कुणाच्या विरोधात कट रचण्यासाठी किंवा निवडणुकीत कुणाचे तिकीट कापण्यासाठी, केले असावे. तर काहींना वाटते की, कुणाचे तिकीट पक्के करण्यासाठी असा प्रकार केला गेला असावा. पोलिसांना याची माहिती देण्यात आली आहे. बारामतीत अशा प्रकारची घटना पहिल्यांदाच घडल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान हा प्रकार सुरुवातीला अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्याध्यक्ष विपुल पाटील यांनी उघडकीस आणला. त्यांनी सोशल मिडियावर यासंबंधी पोस्टही केली. पाटील हे सोमवारी (दि. १७) छत्रपती कारखान्याचे संचालक अजित पाटील, अभिनेते रामभाऊ जगताप यांच्यासह सोमवारी सकाळी सहयोग सोसायटीसमोर मॉर्निंग वॉक साठी निघाले असताना त्यांना हा प्रकार आढळून आला. येथील अघोरी पूजा व उतारा पाहून येणारे जाणारे जरा लांबूनच जातत होते. स्वच्छता करणारी महिला मनातील अंधश्रद्धेमुळे स्वच्छता करण्यास धजावत नव्हती. अखेर पाटील यांनी उतारा ठेवलेल्या ठिकाणी थांबत ती जागा साफ करायला लावली.ज्या बारामतीत सिंगापूरच्या धर्तीवर सुधारणा केल्या जात आहेत तेथे अशा खुळचट विचाराने रस्त्यावर कर्मकांड होत असतील तर नेमके आपण चाललोय कुठे ? असा सवाल पाटील यांनी केला. निवडणूका जवळ आल्या की अशा गोष्टी घडतात, कदाचित त्यातून हा प्रकार घडला असावा अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली.

# हिंजवडीत डंपरखाली चिरडल्याने तरुणीचा मृत्यू

**पिंपरी । प्रतिनिधी**





हिंजवडी परिसरातील अवजड वाहनांच्या अपघातात पुन्हा एकदा एका निरपराध तरुणीला जीव गमवावा लागला आहे. सोमवारी (दि. १७) दुपारी सव्वाएकच्या सुमारास मुळशी तालुक्यातील जांबे येथे झालेल्या अपघातात २० वर्षीय तरुणीचा जागीच मृत्यू झाला. विशेष म्हणजे, हा संपूर्ण प्रकार तिच्या वडिलांच्या डोळ्यासमोर घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातानंतर संबंधित डंपरचालक वाहनासह पसार झाला आहे.

तन्वी सिद्धेश्वर साखरे (२०, रा. मुक्तानंद हाइट्स, हिंजवडी-डांगे चौक रोड) ही वडील सिद्धेश्वर लक्ष्मण साखरे (४५) यांच्यासोबत दुचाकीवरून सावंत पार्क चौकातून जात असताना हा अपघात झाला. डंपरची अचानक धडक बसताच दुचाकी रस्त्यावर कोसळली आणि तन्वी थेट डंपरच्या चाकाखाली आली. जागीच मृत्यू झालेल्या तन्वीच्या वडिलांना किरकोळ दुखापत झाली असून, डंपर चालकाने घटनास्थळावरून पलायन केले आहे. हिंजवडी आणि आसपासच्या परिसरात अवजड वाहनांमुळे होणाऱ्या अपघातांची मालिकाच सुरू असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वीच या संदर्भात स्थानिकांनी मोर्चा काढून वाहतूक विभागाचे लक्ष वेधले होते. पोलिसांनीदेखील अपघात रोखण्यासाठी थेट गुन्हे दाखल करण्यात सुरुवात केली आहे. मात्र, तरीदेखील अपघात कमी होत नसल्याने आणखी ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. हिंजवडी आयटी पार्क परिसरात सकाळी व सायंकाळी गर्दीच्या वेळी अवजड वाहनांना प्रवेशबंदी आहे. दरम्यान, परवानगी असलेल्या वेळातही अवजड वाहनचालक भरधाव वेगात वाहने चालवतात. मागील दहा महिन्यांत या वाहनांनी पाच महिलांचे बळी घेतले आहेत.

# कामातील निष्काळजीपणा भोवला, दोन अभियंते निलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

वारजे येथे निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण केल्याचे नागरिकांनी समोर आणून त्याचे व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाले होते. या प्रकरणी ठेकेदाराला एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. तर पथ विभागाच्या दोन अभियंत्यांनी त्यांच्या कामात निष्काळजीपणा केल्याचे चांगलेच भोवबे असून, त्यांना निलंबित केले आहे. त्यामुळे थातूरमातूर काम करणाऱ्यांना चांगलाच झटका बसला आहे.

पुणे शहरात खड्डे मुक्त अभियान सुरू आहे. याचे उद्घाटन नुकतेच महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते झाले आहे. हे अभियान सुरू झाल्यानंतर त्याचे काम चांगल्या दर्जाचे होणे अपेक्षित होते.

वारजे येथे महापालिकेच्या ठेकेदाराने मातीवर डांबरीकरण केले, पण व्यवस्थित दबाई न केल्याने डांबराचे थर निघून जात होते. हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा व्हिडिओ एका तरुणाने तयार करून तो समाज माध्यमावर व्हायरल केला होता. त्यामुळे महापालिकेच्या कामावर झोड उठली होती.

हा प्रकार आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी ठेकेदाराला एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. पुढील वेळी अशा चुकीच्या पद्धतीने काम केल्यास काळ्या यादीत टाकण्याचे आदेश दिले होते. तर या कामावर देखरेख ठेवणाऱ्या कनिष्ठ अभियंता व उप अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्यांनी त्यावर समाधानकारक खुलासा न केल्याने दोघांचेही निलंबन करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा 'एल्गार'! मागण्या मान्य न झाल्यास दहावी-बारावीच्या परीक्षांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या प्रश्नांकडे राज्य शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी राज्य माध्यमिक शाळा-शिक्षकेतर संघटनांच्या महामंडळातर्फे शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. मागण्या मान्य झाल्या नाही तर दहावी, बारावी परीक्षा व निवडणूक कामकाजावर बहिष्कार घालण्याचा इशाराही देण्यात आला.शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे नेते शिवाजी खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली शनिवार वाडा ते शिक्षण आयुक्त कार्यालय दरम्यान मोर्चा काढण्यात आला.



पुणे विभागाचे शिक्षक आमदार जयंत आसगावकर, संघटनेचे अध्यक्ष अनिल माने, कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर, विना अनुदानित कृती समितीचे खांडेराव जगदाळे, मुख्याध्यापक संघटनेचे हरिषचंद्र गायकवाड, शिक्षक लोकशाही आघाडीचे शिवाजी कामथे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले. यावेळी शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

शासनाने शिक्षकेतर कर्मचारी भरतीला मान्यता दिली तरी त्याची प्रक्रिया सुरू केलेली नाही. ही भरती सुरू करावी. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे २४ वर्षानंतरच्या लाभाच्या अनुषंगाने वेतन निश्चिती करावी, नवीन प्रगती योजनेबाबत निर्णय घ्यावा. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी शिक्षक पदाला पात्र असणाऱ्यांना वेतनश्रेणीत पदोन्नती मिळावी, शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त झाल्यास त्यांच्या पदात, वेतनश्रेणीत बदल करू नये आदी मागण्या निवेदनात केल्या आहेत.शासनाने कर्मचाऱ्यांच्या संयमांचा अंत पाहू नये, असा इशाराही खांडेकर यांनी यावेळी दिला.

# पुण्यात बसचा थरार! चालक उतरला अन् बस चालू लागली; चालत्या गाडीतून प्रवाशांच्या उड्या

**पुणे । प्रतिनिधी**

बसचा चालक लघुशंकेसाठी उतरला.. थोड्या वेळातच बस चालू लागली अन् प्रवाशांचा गोंधळ उडाला. ही घटना पुण्यातल्या नऱ्हे भागात घडली आहे. सुदैवाने या कुठलीही जीवितहानी झालेली नसली तरी बसचं नुकसान झालं आहे. प्रवाशांचीदेखील भीतीने गाळण उडाली होती.

मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता पुण्यातल्या नऱ्हे येथे ही घटना घडली. नऱ्हे भागातल्या भैरवनाथ मंदिराजवळ पीएमपीएमएलची बस थांबवून बसचा चालक लघुशंकेसाठी गेला. चालक गेल्यानंतर काही वेळातच बस हळूहळू पुढे जाऊ लागली. या बसचा थोडा वेग वाढला आणि महावितरणच्या डीपीवर जाऊन बस आदळली.

धक्कादायक बाब म्हणजे काही अंतरावरच एक रिक्षा आणि दुचाकी उभी होती. परंतु बस त्यांच्या बाजूने गेल्याने मोठा अपघात टळला आणि दोन जीव वाचले. शिवाय वीजेच्या डीपीला बस धडकून कुठलीही अप्रिय घटना घडली नाही. या अपघातात बसची पुढील काच फुटली आहे.

विशेष म्हणजे ज्या रस्त्यावर हा अपघात झाला तो रस्ता नऱ्हे गावातील मुख्य वाहतुकीचा रस्ता आहे. मुख्य चौकात चालकाने हलगर्जीपणा केल्याने प्रवाशांमधून संताप व्यक्त होतोय. बस चालू लागली तेव्हा काही प्रवाशांनी जीवावर बेतून बसमधून खाली उड्या घेतल्या. या प्रकरणी दोषीवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# मुळशीपॅटर्न फेम पिट्या भाई भाजपात जाणार? राज ठाकरेंच्या कानपिचक्यांनंतर पुन्हा संघाच्या गणवेशात, सूचक पोस्ट

**पुणे । प्रतिनिधी**



मुळशी पॅटर्न या चित्रपटातील ' पिट्या भाई ' या भूमिकेने अभिनेता म्हणून खऱ्या अर्थाने ओळख मिळवून दिलेले अभिनेते रमेश परदेशी उर्फ पिट्या भाऊ भाजपात जाणार असल्याची चर्चा आहे .काही दिवसांपूर्वी मनसे अध्यक्ष राज ठाकरे पुणे दौऱ्यावर असताना संघाच्या गणवेशावरून रमेश परदेशी यांना छापल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या .त्यानंतर आज थेट रमेश परदेशी यांनी एक सूचक फेसबुक पोस्ट केली आहे संघाच्या गणवेशातील फोटो पोस्ट करत लिहिलेली ही पोस्ट सध्या लक्ष वेधून घेत आहे . मी माझ्या विचारांसोबत राष्ट्रप्रथम .. असं लिहीत त्यांनीही पोस्ट केली आहे . त्यामुळे ते भाजपमध्ये पक्षप्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे .

काही दिवसांपूर्वी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मुळशी पॅटर्न सेम अभिनेते रमेश परदेशी यांना सुनावल्याची चर्चा होती .त्यांनी आरएसएसच्या संचलनाचा फोटो सोशल मीडियावर टाकल्याने हा वाद ओढवल्याचं कळत होतं . त्यानंतर राज ठाकरेंनी छाती ठोकपणे सांगतो मी संघाचा कार्यकर्ता आहे असं म्हणताय तर मग इथे कशाला टाईमपास करायला आलात ? एकाच ठिकाणी कुठेतरी राहा असं ते म्हणाले होते . यावर अभिनेते रमेश परदेशी यांनी असं काहीही घडलं नसल्याचं सांगितलं होतं . दरम्यान पुन्हा एकदा अभिनेते रमेश परदेशी फेसबुक पोस्ट समोर आल्याने ते भाजपमध्ये प्रवेश करणार का ?असा सवाल उपस्थित होत आहे .

अभिनेते रमेश परदेशी यांनी संघ संचालनाचा एक फोटो पोस्ट करत त्यावर मी माझ्या विचारांसोबत राष्ट्रप्रथम असं लिहिला आहे . जय हिंद जय महाराष्ट्र असं म्हणत त्यांनी ही पोस्ट केली आहे . यावर अनेकांनी पिट्या भाऊ पक्ष सोडलाय का ? निर्णय घ्या एकदाचा अशा कमेंट करत आहेत.

अभिनेते रमेश परदेशी यांनी चित्रपटांमधून अनेक वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. त्यांनी पडद्यावर साकारलेला खलनायक अधिक गाजला. मात्र, त्यांना खरी ओळख मिळवून दिली ती 'मुळशी पॅटर्न' या चित्रपटाने. या चित्रपटात त्यांनी साकारलेली 'पिट्या भाई' ही भूमिका विशेष गाजली होती. या चित्रपटाने त्यांच्या आयुष्याला आणि करिअरला एक वेगळी दिशा मिळवून दिली. या आधी रमेश परदेशी 'रेगे', 'देऊळबंद', 'फत्तेशिकस्त', 'बेरीज वजाबाकी' आणि अजय देवगण याच्या 'सिंघम' या चित्रपटांमध्ये देखील त्यांनी काम केले आहे.

# खासगी ट्रॅव्हल्स बसेसना पुणे शहरात नवे नियम लागू, नवीन मार्गांची अमलबजावणी सुरु



**पुणे । प्रतिनिधी**


शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी खासगी ट्रॅव्हल्स आणि लक्झरी बसेसना नवीन मार्ग, थांबेव्यवस्था आणि पिक अवर्समध्ये कठोर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्याची अंमलबजावणी सुरू केली असून, नागरिकांकडून हरकती सूचना मागवून अंतिम आदेश लवकरच जाहीर केला जाणार आहे.

रस्त्यावर होणारी बसेसची गर्दी आणि पिक अवर्समध्ये कोंडीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक शाखेच्या कार्यालयात ट्रॅव्हल्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसमवेत नुकतीच बैठक घेण्यात आली. त्यात झालेल्या चर्चेनुसार नवा आदेश काढण्यात आला आहे. त्यानुसार १५ नोव्हेंबरपासून अंमलबजावणी सुरू केली आहे.पुढील १५ दिवसांत नागरिक, संस्थांकडून हरकती सूचना मागविण्यात येतील. त्यानुसार अंतिम आदेश काढण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील आणि पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.

# सावत्र आईची क्रूरता! ११ वर्षांच्या मुलाला स्टंपने मारहाण; पुण्यात धक्कादायक प्रकार

**पुणे । प्रतिनिधी**

खराडी येथील इस्टर्न मिडोज सोसायटीमध्ये राहणाऱ्या ११ वर्षांच्या मुलाला सावत्र आई आणि वडिलांनी प्लास्टिक स्टंप व हाताने मारहाण करत चटके दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही घटना १६ नोव्हेंबर सायंकाळी घडली. याप्रकरणी खराडी पोलिस ठाण्यात सावत्र आईसह वडीलांवर क्रूर वागणूक दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अकरावर्षीय मुलगा सोसायटीच्या गेटवर सुरक्षा रक्षकाच्या केबिनमध्ये रडत होता. सोसायटीचे चेअरमन विश्वनाथ घुले यांना ही माहिती मिळाली; परंतु घुले हे बाहेर असल्यामुळे त्यांनी सोसायटीतील रहिवाशी आनंद शिंदे यांना संपर्क करून माहिती दिली.

शिंदे घरीच असल्यामुळे तत्काळ सोसायटीवर गेटवर गेले असता त्या ठिकाणी मुलगा रडत असल्याचे दिसून आले. शिंदे यांनी त्या मुलाची विचारपूस केली असता त्याने माझ्या आई-वडिलांनी मला लाटण्याने व प्लास्टिक स्टंप तसेच हाताने मारून घराबाहेर काढल्याचे सांगितले. त्यानंतर शिंदे यांनी चाइल्ड हेल्पलाइन व पोलिसांशी संपर्क करून सदर घटनेची माहिती दिली. थोड्याच वेळात पोलिस सदर ठिकाणी आल्यानंतर मुलाची विचारपूस केली. मुलाच्या मानेवर, छातीवर, हातावर, बरगडीखाली आणि पोटावर मारहाणीचे तसेच भाजल्याचे जखमेचे व्रण दिसून आले. त्याचे टी-शर्टही फाटलेले होते. यापूर्वीही सुमारे तीन महिन्यांपूर्वी अशाच प्रकारे मारहाणीची तक्रार सोसायटीतील सुरक्षा रक्षकांना मुलाने केली होती. त्यावेळी सोसायटीतील सदस्यांनी मुलाचे वडील आणि आई यांना समजावले होते. त्यावेळी त्यांनी मुलाला त्रास देणार नसल्याचे सांगितले. मात्र त्याच्या आईने त्याला मारहाण केली. मारहाण करणारी महिला मुलाची सावत्र आई आहे. तिला तिच्या पहिल्या विवाहातून एक मुलगी आहे. किरकोळ कारणावरून ती वारंवार मुलाला मारहाण करत होती. घटनेची माहिती चाइल्ड हेल्पलाइन तसेच पोलिसांना कळवताच काही वेळातच पोलिस घटनास्थळी पोहोचले. चौकशीनंतर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा आई-वडिलांवर मुलाच्या वैद्यकीय तपासणीनंतर गुन्हा दाखल केला आहे.

# ॲड. असीम सरोदे यांची सनद रद्द करण्याच्या आदेशाला बार कौन्सिल ऑफ इंडियाची स्थगिती

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

वकील असीम सरोदे यांची सनद रद्द करण्याचा निर्णय बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र न्ड गोवा यांनी घेतला होता. या निर्णयाला बार कौन्सिल ऑफ इंडियाने स्थगिती दिली आहे. दरम्यान, बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या या निर्णयाचे असीम सरोदे यांनी स्वागत केले आणि 'सत्याचा विजय होण्याची ही सुरुवात आहे,' असे म्हणत बार कौन्सिल ऑफ इंडियाचे आभारही मानले आहेत.



बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या अध्यक्षांच्या निर्देशानुसार, कौन्सिलच्या शिस्तपालन समितीसमोर या स्थगिती अर्जाचा विचार करण्यात आला. सदर अर्ज बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र न्ड गोवाने १२ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या आदेशाविरुद्ध दाखल करण्यात आले होते. यासंबंधीचे रेकॉर्ड पाहिल्यानंतर समितीला असे वाटते की, प्रथमदर्शनी एक केस तयार झाली आहे आणि येथे अपीलकर्त्यांच्या (असीम सरोदे) बाजूने सोयीचे संतुलन आहे. असीम सरोदे यांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र न्ड गोवासमोर दाखल केलेल्या काही कागदपत्रांमधून व्यावसायिक गैरवर्तन सिद्ध होते की नाही, याची योग्य व सखोल तपासणी करणे समितीस आवश्यक आहे. त्यामुळे, या टप्प्यावर बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र न्ड गोवाने दिलेल्या विवादित आदेशाची अंमलबजावणी स्थगित ठेवण्यात येत आहे. दोन्ही पक्षांना नोटीस जारी करण्यात येत असून असीम सरोदे यांनी त्यांच्या अर्जानुसार मागितलेला अंतरिम दिलासा मंजूर करण्यात येत आहे. पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते आणि वकील असीम सरोदे यांनी मार्च २०२४ मध्ये एका कार्यक्रमात राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्षांबद्दल काही विधाने केली होती. राज्यपाल फालतू आहेत आणि न्यायव्यवस्था सरकारच्या दबावाखाली आहे, अशा आशयाची ती विधाने होती. त्यावर सामाजिक कार्यकर्ते राजेश दाभोळकर यांनी या विधानांविरोधात तक्रार दाखल केली होती.

या तक्रारीनंतर स्थापन झालेल्या समितीने संपूर्ण प्रकरणाचे तपास करून या तपासणीत असीम सरोदे यांनी राज्यपालांचा आणि न्यायव्यवस्थेचा अपमान केल्याचे स्पष्टपणे दिसून आल्याचे म्हटले. समितीने ड. सरोदे यांच्यावर व्यावसायिक गैरवर्तनाचा ठपका ठेवला आणि असीम सरोदेंची सनद ३ महिन्यांसाठी निलंबीत करण्यासह २५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली होती.

# एमआयटी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनचा 'मेरीकी -२०२५' गुरुवारपासून
## कोपा मॉलमध्ये भरणार ५०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या डिझाइन प्रकल्पांचे प्रदर्शन

पुणे : एमआयटी आर्ट, डिझाइन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठातील एमआयटी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनतर्फे 'मेरीकी २०२५' या प्रतिष्ठित प्री-ग्रॅज्युएशन डिझाइन प्रदर्शनाचे ११वे आवर्तन जाहीर करण्यात आले आहे. हे त्रिदिवसीय प्रदर्शन २०, २१ व २२ नोव्हेंबर २०२५ रोजी कोपा मॉल, कोरेगाव पार्क, पुणे येथे, सकाळी १०.०० ते संध्याकाळी ८.०० या वेळेत होणार आहे.




या प्रदर्शनात बी.डिझाइन आणि एम. डिझाइनच्या ५०० पेक्षा अधिक अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादर करण्यात येणार आहेत. ॲनिमेशन डिझाइन, फिल्म ॲन्ड व्हिडिओ डिझाइन, ग्राफिक डिझाइन, इंटिरिअर स्पेस ॲण्ड फर्निचर डिझाइन, प्रॉडक्ट डिझाइन, ट्रान्सपोर्टेशन डिझाइन, युजर एक्स्पिरियन्स डिझाइन, फॅशन कम्युनिकेशन, फॅशन डिझाइन, रिटेल ॲण्ड एक्झिबिशन डिझाइन, डिझाइन मॅनेजमेंट, फॅशन मॅनेजमेंट ॲण्ड मार्केटिंग, इन्फॉर्मेशन डिझाइन ॲण्ड डेटा व्हिज्युअलायझेशन, इमर्सिव्ह मीडिया डिझाइन, इनोव्हेशन ॲण्ड आंत्रप्रुनरशिप तसेच ऑटोमोटिव्ह क्ले स्कल्प्टिंग या विविध शाखांतील प्रकल्प यामध्ये प्रदर्शित होणार आहेत.

या कार्यक्रमाचे उद्घाटन लँडोर इंडियाचे क्रिएटिव्ह डायरेक्टर श्री. अर्णब रे यांच्या हस्ते होणार असून, ते पदवीधर विद्यार्थ्यांना उद्योगातील बदलत्या प्रवाहांबाबत मार्गदर्शनही करणार आहेत, अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेत डॉ.नचिकेत ठाकूर यांनी दिली. मेरीकी २०२५ चे आयोजन एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा प्र.कुलपती प्रा. डॉ. मंगेश तु. कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., डिझाइन संकुलाचे अधिष्ठाता डॉ. नचिकेत ठाकूर आणि सह-अधिष्ठाता प्रा. डॉ. दांदेस्वर बिसोई यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या नेतृत्वात सहाय्यक प्राध्यापक डॉ. अर्शिया कपूर (प्रमुख, फॅशन विभाग), सहाय्यक प्राध्यापक डॉ. अमित सिन्हा (प्रमुख, फाऊंडेशन विभाग) व विष्णू के. एस. (प्रमुख, मेकर्स स्पेस) यांचा सहभाग आहे. या वर्षीचे आकर्षण म्हणजे २१ नोव्हेंबर २०२५ रोजी होणारा फॅशन शो, ज्यामध्ये फॅशन डिझाइन शाखेचे विद्यार्थी आपली अंतिम कलेक्शन्स सादर करणार आहेत. मेरीकी २०२५साठी आयोजकांकडून उद्योगातील तज्ज्ञ, माध्यम प्रतिनिधी, डिझाइन व्यावसायिक, विद्यार्थी, प्राध्यापक तसेच सर्व रसिक नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.